संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी,
वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २६६ * * अकोला * रविवार, दिनांक २३ मार्च २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)




# दंगेखोरांची प्रॉपर्टी विकून नुकसान भरपाई वसूल करणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली नागपुरातील दंगलीची आढावा बैठक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी नागपुरातील दंगलीचा आढावा घेतला. यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधल्यानंतर त्यांनी दंगेखोरांकडून नुकसान भरपाई वसूल करण्याचा निश्चय व्यक्त केला. नागपूर दंगलीत झालेल्या नुकसानीची भरपाई दंगेखोरांकडून केली जाईल. विशेषतः त्यांनी पैसे भरले नाही तर त्यांची प्रॉपर्टी विकून त्याची भरपाई केली जाईल, असे ते म्हणाले. या दंगलीसंबंधी वादग्रस्त पोस्ट करणाऱ्यांना दंगलखोरांसोबत सहआरोपी करण्याचा निर्णयही त्यांनी घेतला आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी आज नागपूरमध्ये घडलेल्या घटनेचा आढावा मी नागपूरच्या वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांकडून घेतला. एकूण घटनाक्रम आणि त्यानंतर केलेली कारवाई या सगळ्या गोष्टींचा हा आढावा होता. मुळातच काही गोष्टी मी सभागृहातही स्पष्ट केल्यात. त्यानुसार, औरंगजेबाची एक प्रतिकात्मक कबर सकाळी जाळण्यात आली. त्यानंतर काही लोकांनी पोलिसांत तक्रार दाखल केली होती. पण त्यानंतर कबर जाळताना पवित्र कुराणमधील आयती लिहिलेली चादर जाळल्याची अफवा पसरली. काही लोकांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून अपप्रचार केला. त्यानंतर सायंकाळी जमाव जमला. या जमावाने तोडफोड केली, जाळपोळ केली, गाड्या फोडल्या. लोकांवर हल्ले केले. पोलिसांनी ४-५ तासांतच स्थिती नियंत्रणात आणली. त्यासाठी अश्रूधुराच्या नळकांड्या असतील किंवा इतर प्रकारच्या प्रतिबंधात्मक ज्या गोष्टी करायची गरज होती त्या सर्व गोष्टींचा वापर पोलिसांनी केला.

ते म्हणाले, ज्या लोकांचे नुकसान झाले, काहींच्या गाड्या फुटल्या, काहींच्या अंशतः फुटल्या, त्या सर्वांना येत्या ३-४ दिवसांत नुकसान भरपाई दिली जाईल. आत्ता जे काही निर्बंध घातले आहेत, त्या निर्बंधांमुळे जनजीवन व व्यापारावर परिणाम होत आहे. त्यामुळे त्यात लवकरात लवकर शिथीलता आणावी असा प्रयत्न आहे. पण त्याचवेळी पोलिस सजग राहणार आहेत. कुणीही दंगा करण्याचा प्रयत्न केला, तरी देखील अतिशय कडक कारवाई केली जाईल. आत्ता जे काही नुकसान झाले आहे, ते सर्व नुकसान दंगेखोरांकडून वसूल केली जाईल. त्याची सगळी किंमत काढली जाईल. ती दंगेखोरांकडून वसूल केली जाईल.



### १०४ आरोपींची ओळख पटली, ९२ जणांना अटक

या घटनेचे जेवढे सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध होते त्याच्यासह खासगी लोकांनी आपल्या मोबाईलमध्ये केलेले चित्रिकरण व पत्रकारांच्या व्हिडिओमध्ये दिसणाऱ्या लोकांवर पोलिसांनी कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. १०४ लोकांची आतापर्यंत ओळख पटली आहे. त्यापैकी ९२ जणांना अटक करण्यात आली आहे. १२ जण १८ वर्षांखालील असल्यामुळे त्यांच्यावर संबंधित कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे. . याहून अधिक लोकांना अटक केली जाणार आहे.

### वादग्रस्त पोस्ट करणाऱ्यांना सहआरोपी करणार

मुख्यमंत्री म्हणाले, एखादा व्यक्ती दंगल करताना दिसतो, दंगेखोरांना मदत करताना दिसतो, त्या सर्वांवर पोलिस कारवाई करतील. यात कुणालाही सोडले जाणार नाही. विशेषतः सोशल मीडियाचे मोठ्या प्रमाणात ट्रॅकिंग करून ज्या लोकांनी ही घटना घडावी किंवा तिचा प्रसार व्हावा म्हणून पोस्ट केल्या, त्या सर्वांना दंगेखोरांसोबतच सहआरोपी केले जाणार आहे. कारण, त्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून ही दंगल भडकवण्यासाठी मदत केली. जवळपास ६८ पोस्टची आत्तापर्यंत ओळख पटवून डीलिट करण्यात आल्या आहेत. त्यांच्यावर कारवाई झाली आहे. अजून काही पोस्टची माहिती घेणे चालू आहे. अशा प्रकारे ज्या लोकांनी दंगल भडकवण्यासाठी पॉडकास्ट केले, ज्यांनी चुकीच्या पोस्ट टाकून अफवा पसरवून लोकांमध्ये एक पॅनिक तयार केली. अशा सर्व लोकांवर मोठ्या प्रमाणावर कारवाई होईल.

# नागपूर हिंसाचारात जखमी झालेल्या इरफान अन्सारीचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :

नागपूर दंगलीत गंभीर जखमी झालेल्या इरफान अन्सारी नामक व्यक्तीचा शनिवारी उपचारादरम्यान मृत्यू झाला. हा नागपूर दंगलीतील पहिला बळी ठरला आहे. या घटनेत पोलिस अधिकाऱ्यांसह अनेकजण जखमी झालेत.

औरंगजेबाच्या कबरीच्या मुद्यावरून गत १७ मार्च रोजी नागपुरात मोठी दंगल उसळली होती. त्यात मोठी दगडफेक, वाहनांची तोडफोड व जाळपोळ झाली होती. त्यात पोलिसांसह अनेक नागरीक जखमी झाले होते. यात इरफान अन्सारी यांचाही समावेश होता. ते दंगल झालेल्या परिसरात जखमी अवस्थेत आढळले होते. दंगल नियंत्रणात आल्यानंतर त्यांना तातडीने येथील मेयो रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तिथे त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते. अखेर शनिवारी उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. या मृत्यूमुळे नागपूर दंगलीचे गांभिर्य अजून वाढले आहे.

नागपूर दंगलीत २० दुचाकी, ४० चारचाकी व २ क्रेन जाळण्यात आल्या आहेत. या क्रेन उड्डाणपुलाच्या कामासाठी आणण्यात आल्या होत्या. त्या जाळल्यामुळे कंस्ट्रक्शन कंपनीचे जवळपास ७० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे. प्रशासनाने नुकसान झालेल्या वाहनास प्रतिवाहन ५० हजार, तर अंशतः नुकसान झालेल्या वाहनाला १० हजार रुपयांची भरपाई देण्याची घोषणा केली आहे.

नागपूर हिंसाचाराला कारणीभूत ठरलेले व्हिडिओ इतर देशातील आहेत. सायबर पोलिसांना तपासात हिंसाचार भडकवणारे तब्बल १७२ व्हिडिओ सापडले आहेत. बांग्लादेश आणि इतर देशातील वढ अड्रेसवरुन हे व्हिडिओ व्हायरल करण्यात आले. पोलिस त्याचा अधिक तपास करत आहेत. नागपूरच्या दंगलीचा मास्टर माईंड फहीम खानचे मालेगाव कनेक्शन समोर आले आहे.



### अजून दोघांना अटक

दुसरीकडे, नागपूर पोलिसांनी या दंगलीप्रकरणी आणखी दोघांना अटक केली आहे. गुन्हे शाखेकडून या दोघांचीही कसून चौकशी सुरू आहे. दुसरीकडे, या प्रकरणी अटक करण्यात आलेल्या फहीम खानने जामिनासाठी कोर्टात अर्ज केला आहे. त्याच्या अर्जावर सोमवारी सुनावणी होण्याची शक्यता आहे. डीसीपी हल्ला व महिला विनयभंगाचे प्रकरण गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आले आहे.

# अलाहाबाद हायकोर्टाच्या निर्णयावर भडकल्या नीलम गोऱ्हे

## सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप करावा

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २२ :



अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या एका निर्णयावरून नवीन वादाला तोंड फुटले आहे. न्यायालयाने म्हटले होते की, महिलेच्या गुप्तांगाला स्पर्श करणे आणि तिच्या पायजम्याची नाडी ओढणे हा बलात्कार किंवा बलात्काराचा प्रयत्न मानले जाणार नाही. यावर विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सर्वोच्च न्यायालयाला पत्र लिहिले आहे.

नीलम गोऱ्हे यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लैंगिक अत्याचार प्रकरणातील वादग्रस्त निकालाची स्वतःहून दखल घेण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयाच्या सेक्रेटरी जनरल यांच्याकडे केली आहे. नीलम गोऱ्हे यांनी या निकालामुळे महिलांच्या सुरक्षेवर होणाऱ्या परिणामांविषयी चिंता व्यक्त केली असून, लैंगिक गुन्ह्यांविरोधातील कठोर कायद्यांचा हेतू न्यायालयीन निर्णयांमध्ये प्रतिबिंबित व्हावा, यासाठी सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. त्यांनी पुढे म्हटले की, या निकालामुळे लैंगिक अत्याचार पीडितांना मिळणाऱ्या कायदेशीर संरक्षणावर परिणाम होईल आणि कायद्याचा धाक राहणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने याची स्वतःहून दखल घेत उचित निर्णय घेतला पाहिजे. यामुळे न्यायव्यवस्थेची जबाबदारी अधिक स्पष्ट होत असून, महिलांच्या सुरक्षेसाठी मजबूत कायद्यांची अंमलबजावणी करण्याची गरज अधोरेखित होते. सर्वोच्च न्यायालयाने यामध्ये हस्तक्षेप केल्यास न्यायव्यवस्थेवरील लोकांचा विश्वास अधिक दृढ होईल आणि लैंगिक गुन्हे करणाऱ्यांना योग्य ती शिक्षा मिळेल.

१७ मार्चच्या आदेशात, न्यायमूर्ती राम मनोहर मिश्रा म्हणाले की, बलात्काराच्या प्रयत्नाचा आरोप निश्चित करण्यासाठी, सरकारी वकिलांना हे सिद्ध करावे लागेल की खटला केवळ तयारीच्या पलीकडे गेला होता. तयारी आणि प्रत्यक्ष प्रयत्न यांच्यामध्ये आत भरपूर दृढनिश्चय असतो. या प्रकरणात, आरोपी आकाशने पीडितेला नाल्याखाली ओढण्याचा आणि तिचा नाडा तोडण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे.

# वडिलांकडून मुलाची गळा चिरून हत्या

■ महासागर प्रतिनिधी पुणे, दि. २२ :

पुण्यात एका वडिलांनी आपल्या साडेतीन वर्षांच्या मुलाचा गळा चिरून हत्या केली. त्याचा मृतदेह जंगलात फेकून देण्यात आला. नंतर तो एका लॉजमध्ये मद्यधुंद अवस्थेत आढळला. पोलिसांनी आरोपी वडिलांना अटक केली आहे. चंदन नगर परिसरातील जंगलातून मुलाचा मृतदेह सापडला आहे.

पोलिसांनी सांगितले की, आरोपीचे नाव माधव टिकेती (३८) आहे. त्याला संशय होता की त्याची पत्नी स्वरूपा हिचे कोणाशी तरी अवैध संबंध आहेत. माधवचे २० मार्च रोजी पत्नीशी भांडण झाले. तो त्याचा धाकटा मुलगा हिम्मत याला सोबत घेऊन घराबाहेर पडला होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, माधव आपल्या मुलाला घेऊन जंगलात गेला, जिथे त्याने त्याच्या मुलाचा गळा चिरून खून केला. जेव्हा स्वरूपा अनेक तासांपर्यंत तिच्या पतीशी संपर्क साधू शकली नाही, तेव्हा तिने चंदन नगर पोलिस ठाण्यात तिचा पती आणि मुलगा बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली.

# शिवशाही बसला लागली आग

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. २२ :

यवतमाळ येथे जात असलेल्या शिवशाही बसला बडनेरा ते यवतमाळ मार्गावर माहुली चोर गावानजीक अचानक आग लागली.शनिवारी दुपारी ३.३० वाजताच्या सुमारास ही घटना घडली. बसमधून तीन जण प्रवास करीत होते. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. अमरावती आगाराची शिवशाही बस माहुली चोर या गावानजीक पोहचली असताना बसच्या केबिनमधून धूर येण्यास सुरूवात झाली. बसचालकाने प्रसंगावधान राखून रस्त्याच्या कडेला बस थांबवली.






# धरणात ३४ टक्के पाणीसाठा शिल्लक

■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. २२ :** मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या सातही धरणातील पाणीसाठा३४ टक्क्यांवर आला आहे. वातावरणातील उष्मा वाढू लागला असून हा पाणीसाठा जुलै अखेरीसपर्यंत पुरवावा लागणार आहे. मुंबईकरांना पाणीकपातीला सामोरे जावे लागू नये म्हणून मुंबई महापालिकेने आधीच राज्य सरकारकडे राखीव साठ्याच्या वापरासाठी विनंती केली आहे. पाऊस लांबल्यास मुंबई महापालिकेला या राखीव साठ्याचा वापर करावा लागणार आहे.



मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या उर्ध्व वैतरणा, मोडकसागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार आणि तुळशी या सातही धरणातील मिळून एकूण पाणीसाठा सध्या ३४.१५. टक्के आहे. सातही धरणांची पाणी साठवण्याची क्षमता १४लाख ४७हजार दशलक्षलीटर इतकी आहे. त्यातुलनेत सध्या सात धरणात मिळून ५लाख ६६ हजार ५४४ दशलक्षलीटर पाणीसाठा आहे. हा पाणीसाठा गेल्यावर्षीपेक्षा जास्त असला तरी जुलै अखेरपर्यंत पाणीसाठा पुरवावा लागणार आहे.

गेल्यावर्षी याच दिवशी ३३ टक्के पाणीसाठा होता. तर त्या आधीच्यावर्षी हाच पाणीसाठा ४०.२१. टक्के होता.

हा पाणीसाठा सध्या पुरेसा असला तरी प्रत्यक्षात मुंबईत अनेक ठिकाणी आतापासूनच पाण्याचा दाब कमी आहे. त्यामुळे मुंबईच्या अनेक भागात पाणी टंचाई भेडसावते आहे. तसेच उन्हाचा तापही वाढू लागला असल्यामुळे पाण्याचे बाष्पीभवनही मोठ्या प्रमाणावर होत असते. मुंबईत जून महिन्यात पावसाला सुरुवात होत असली तरी प्रत्यक्षात धरणक्षेत्रात जोरदार पाऊस जुलै महिन्यात पडतो. धरणातील पाणीसाठा हा जुलै महिन्याच्या अखेरपर्यंत पुरेल अशा पद्धतीने नियोजन केले जाते. मात्र तोपर्यंत पुरेसा पडला नाही तर मुंबईकरांना पाणी कपातीला सामोरे जावे लागू शकते.

### किती पाण्याची मागणी

राज्य सरकारच्या मालकीच्या उर्ध्व वैतरणा आणि भातसा या दोन धरणातील राखीव साठ्याची मागणी करणारे विनंती पत्र मुंबई महानगरपालिकेने राज्य सरकारला पाठवले आहे.

उर्ध्व वैतरणा धरणातून ६८ हजार दशलक्षलीटर तर भातसा धरणातून १ लाख १३ हजार दशलक्षलीटर राखीव साठ्याच्या पाण्याची मागणी या पत्राद्वारे मुंबई महापालिका प्रशासनाकडे नोंदवली आहे. गेल्यावर्षीही मुंबई महापालिकेने राखीव साठ्याची मागणी केली होती.

जून २०२४ मध्ये पाणीसाठा ५ टक्क्यांपर्यंत खालावला होता. तेव्हा राखीव साठ्याचा वापर सुरू करण्यात आला होता. यंदाही मागणी केली असली तरी जेव्हा गरज लागेल तेव्हाच त्याचा वापर सुरू केला जाणार असल्याची माहिती पालिकेच्या जल अभियंता विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.

**कोणत्या धरणात किती पाणीसाठा**

**उर्ध्व वैतरणा .४४.२२. टक्के**

**मोडक सागर . २३.५२.टक्के**

# परभणीत सोमनाथ सूर्यवंशीच्या मृत्यूला जबाबदार असलेल्या पोलिसांना केव्हा बडतर्फ केले जाईल? : हर्षवर्धन सपकाळ यांचा सवाल

**गृह मंत्री देवेंद्र फडणवीस कोणाला वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत? परभणी प्रकरणावरून काँग्रेसचा हल्लाबोल**

■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. २२ :** परभणी येथील अंबेडकरी विचारसरणीचा सुशिक्षित युवक सोमनाथ सूर्यवंशी याचा मृत्यू पोलिसी अत्याचारामुळे झाला असून, तरीही हा प्रकार दडपण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे, असा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज केला. सूर्यवंशीच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या पोलिसांवर खुनाचा गुन्हा दाखल करून त्यांना केव्हा बडतर्फ केले जाईल, असा थेट सवालही त्यांनी सरकारला केला.

परभणी प्रकरणावर प्रतिक्रिया देताना सपकाळ म्हणाले, ही घटना मानवीतेवर लागलेला काळा डाग आहे. संविधानाची प्रत जाळण्यात आली, त्या घटनेचे गांभीर्य पोलिसांनी ओळखले नाही. परभणीत सुरू असलेला आंदोलन शांततेत चालू असताना पोलिसांनी अमानुष लाठीचार्ज केला. अनेक आंदोलकांना जबर मारहाण केली आणि तुरुंगात टाकले. याच दरम्यान सोमनाथ सूर्यवंशी याला पोलिसांनी अटक केली, अमानुष मारहाण केली आणि अखेर त्याचा मृत्यू झाला.

पोस्टमॉर्टेम अहवालात सूर्यवंशीचा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीमुळे झाल्याचे स्पष्ट झाले असूनही सरकारने याकडे दुर्लक्ष केले. उलट, नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खोटा दावा करत सूर्यवंशीचा मृत्यू अॅस्थमामुळे झाल्याचे सांगून जनतेची दिशाभूल केली, असा आरोप सपकाळ यांनी केला.

परभणीत झडलेल्या शोधमोहीमेला आणि लाठीचार्जला आदेश कुणी दिले? हे मंत्रालयाचे आदेश होते की पोलिस महासंचालक कार्यालयाचे? याची चौकशी झाली पाहिजे. फडणवीस हे गृह मंत्री आणि मुख्यमंत्री दोन्ही पदांवर असूनही या प्रकरणात ते अपयशी ठरले आहेत, असेही सपकाळ यांनी स्पष्ट केले.

पोलिसांच्या बर्बरतेमुळे एका दलित तरुणाचा मृत्यू झाला आणि तरीही सरकार गंभीर नाही. यावरून भाजप सरकार दलितविरोधी असल्याचे स्पष्ट होते, असा आरोप त्यांनी केला.

या प्रकरणाची गंभीर दखल काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी घेतली आहे. त्यांनी परभणीत जाऊन सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांना न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले आहे.

जोपर्यंत सोमनाथ सूर्यवंशीच्या कुटुंबाला न्याय मिळत नाही, तोपर्यंत काँग्रेस हा लढा सुरू ठेवणार, असा निर्धारही हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केला.

# मध्य रेल्वे मार्गावर ३३२ उन्हाळी विशेष रेल्वे गाड्या मुंबई ते नागपूर, करमळी, तिरुअनंतपुरम रेल्वेगाड्या धावणार

■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. २२ :** उन्हाळी सुट्ट्यांमध्ये होणारी प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन अतिरिक्त गर्दी विभाजित करण्यासाठी मध्य रेल्वेने मुंबई–नागपूर–करमळी तिरुअनंतपुरम, पुणे–नागपू आणि दौंड–कलबुर्गीदरम्यान ३३२ उन्हाळी विशेष रेल्वेगाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे.



छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस –नागपूर- द्विसाप्ताहिक विशेष गाडी (५० फेऱ्या) गाडी क्रमांक०२१३४ द्विसाप्ताहिक विशेष रेल्वेगाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून६ एप्रिल ते २४ जूनपर्यंत दर मंगळवारी आणि रविवारी रात्री .१२.२० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी दुपारी ३.३०. वाजता नागपूर येथे पोहोचेल. गाडी क्रमांक ०२१४० द्विसाप्ताहिक विशेष गाडी६ एप्रिल ते २४ जूनपर्यंत दर मंगळवारी आणि रविवारी रात्री वाजता नागपूर येथून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी१.३० . वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे पोहोचेल. या रेल्वेगाडीला दादर (फक्त ०२१३४ साठी), ठाणे, कल्याण, इगतपुरी (फक्त ०२१४० साठी), नाशिकरोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा येथे थांबा असेल.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस –करमळी साप्ताहिक विशेष गाडी (१८ फेऱ्या) गाडी क्रमांक०११५१ साप्ताहिक विशेष गाडी १० एप्रिल ते ५ जूनपर्यंत दर गुरुवारी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून रात्री १२.२०. वाजता सुटेल आणि त्याचदिवशी दुपारी १.३०. वाजता करमळी येथे पोहोचेल. गाडी क्रमांक ०११५२ साप्ताहिक विशेष गाडी १० एप्रिल ते ५ जूनपर्यंत दर गुरुवारी करमळी येथून दुपारी २.१५. वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी रात्री ३.४५. वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे पोहोचेल. या रेल्वेगाडीला दादर, ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड आणि थिवि येथे थांबा असेल.

लोकमान्य टिळक टर्मिनस करमळी- साप्ताहिक विशेष (१८ फेऱ्या) गाडी क्रमांक ०११२४ साप्ताहिक विशेष रेल्वेगाडी १० एप्रिल ते ५ जूनपर्यंत दर गुरुवारी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून रात्री १०.१५. वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी १२ वाजता करमळी येथे पोहोचेल. गाडी क्रमांक ०११३० साप्ताहिक विशेष रेल्वेगाडी ११ एप्रिल ते ६ जूनपर्यंत दर शुक्रवारी दुपारी २.३०. वाजता करमळी येथून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी पहाटे४.०५ . वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहोचेल. या रेल्वेगाडीला ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड आणि थिवि येथे थांबा असेल.

लोकमान्य टिळक टर्मिनस –तिरुवनंतपुरम साप्ताहिक विशेष (१८ फेऱ्या)

गाडी क्रमांक०१०६३ साप्ताहिक विशेष लोकमान्य टिळक टर्मिनस येथून एप्रिल ते २४ मेपर्यंत दर गुरुवारी दुपारी ४वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी रात्री १०.४५. वाजता तिरुवनंतपुरम येथे पोहोचेल. गाडी क्रमांक ०१०६४ साप्ताहिक विशेष रेल्वेगाडी ५ एप्रिल ते ३१ मेपर्यंत दर शनिवारी दुपारी ४.२०. वाजता तिरुवनंतपुरम येथून सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस येथे तिसऱ्या दिवशी रात्री१२.४५ . वाजता पोहोचेल. या रेल्वेगाडीला ठाणे, पनवेल, पेण, रोहा, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड, थिवि, करमळी, मडगाव, कारवार, गोकर्ण रोड, कुमठा, मुर्डेश्वर, भटकळ, मुकांबिका रोड बिंदूर, कुंदापुरा, उडुपी, सुरतकल, मंगळुरु, कासरगोड, कन्नूर, कालिकत, तिरूर, शोरनुर, त्रिसूर, एर्नाकुलम, कोट्टायम, तिरुवल्ला, चेंगन्नूर, मावेलिक्करा, कायमकुलम आणि कोल्लम येथे थांबा असेल. तसेच, पुणे नागपूर-पुणे साप्ताहिक अति जलद वातानुकुलित विशेष रेल्वेगाडीच्या ४८ फेऱ्या, दौंड–कलबुर्गीअनारक्षित विशेष रेल्वेगाडीच्या १८० फेऱ्या धावतील.

# कोकण रेल्वे महामंडळाचे भारतीय रेल्वेत विलिनीकरण

## मुख्यमंत्री फडणवीसांची विधान परिषदेत घोषणा

**मुंबई :** कोकण रेल्वे महामंडळाच्या आर्थिक अडचणींवर मात करण्यासाठी आणि भविष्यातील प्रकल्पांना गती देण्यासाठी केंद्र सरकारच्या प्रस्तावानुसार कोकण रेल्वे महामंडळाचे भारतीय रेल्वेमध्ये विलिनीकरण करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ही माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज (१४ मार्च) विधान परिषदेत दिली. या निर्णयामुळे कोकण रेल्वेच्या विकासकामांना मोठा निधी उपलब्ध होणार असून, रेल्वेचे स्वायत्त अस्तित्व आणि नाव कायम राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### लक्षवेधी सूचनेवरून चर्चा

कोकण रेल्वे महामंडळाच्या सध्याच्या स्थितीबाबत विधान परिषद सदस्य प्रवीण दरेकर यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी विलिनीकरणाच्या निर्णयाची माहिती दिली. ते म्हणाले, कोकण रेल्वे महामंडळाची स्थापना महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक आणि केरळ या चार राज्यांच्या सहकार्याने झाली होती. पण आर्थिक संकट आणि निधीच्या तुटवड्यामुळे भविष्यातील प्रकल्प राबवण्यात अडचणी येत होत्या. या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी केंद्र सरकारने महामंडळाचे भारतीय रेल्वेमध्ये विलिनीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे.

### विलिनीकरणाचे फायदे

फडणवीस यांनी सांगितले की, या विलिनीकरणामुळे कोकण रेल्वेच्या विकासाला नवे बळ मिळेल. भारतीय रेल्वेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होईल, ज्याचा उपयोग दुहेरी रेल्वेमार्ग तयार करणे, अपघात प्रतिबंधक उपाययोजना राबवणे, स्थानकांचे आधुनिकीकरण आणि इतर महत्त्वाची कामे पूर्ण करण्यासाठी होईल. हा निर्णय कोकणातील रेल्वे सेवेला अधिक सुरक्षित आणि कार्यक्षम बनवेल, असेही त्यांनी नमूद केले.

### स्वायत्तता आणि नाव कायम

विलिनीकरणानंतरही कोकण रेल्वेचे नाव आणि स्वायत्त अस्तित्व कायम ठेवले जाणार असल्याचे फडणवीस यांनी अधोरेखित केले. ते म्हणाले, कोकण रेल्वेची ओळख आणि स्वातंत्र्य अबाधित राहील. फक्त आर्थिक आणि प्रशासकीय पाठबळासाठी हे विलिनीकरण होत आहे. या प्रस्तावाला महाराष्ट्रासह गोवा, कर्नाटक आणि केरळ या तिन्ही राज्यांनी संमती दिली असून, लवकरच याबाबतचा अंतिम प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवला जाणार आहे.

हा निर्णय कोकणातील जनतेसाठी आणि रेल्वे प्रवाशांसाठी दिलासादायक मानला जात आहे. कोकण रेल्वे हा महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवरील दळणवळणाचा कणा आहे, आणि त्याच्या विकासाला गती मिळणे ही काळाची गरज होती. प्रवीण दरेकर यांनी या निर्णयाचे स्वागत केले असून, कोकणच्या विकासासाठी हे पाऊल महत्त्वाचे आहे, असे मत व्यक्त केले. तथापि, काही विरोधी पक्षांच्या नेत्यांनी या विलिनीकरणामुळे स्थानिक हितसंबंधांना धक्का बसू शकतो का, याबाबत शंका उपस्थित केली आहे, ज्यावर सरकारला स्पष्टीकरण द्यावे लागू शकते.

कोकण रेल्वे महामंडळाच्या भारतीय रेल्वेमधील विलिनीकरणामुळे कोकणातील रेल्वे सेवेला नवसंजीवनी मिळण्याची आशा आहे. आर्थिक अडचणींमुळे रखडलेली विकासकामे आता वेग घेतील आणि या भागातील प्रवासी वाहतुकीला चालना मिळेल. चार राज्यांच्या सहमतीने घेतलेला हा निर्णय केंद्र आणि राज्य सरकारमधील समन्वयाचे द्योतक मानला जात आहे. येत्या काही महिन्यांत या विलिनीकरणाची प्रक्रिया पूर्ण होऊन कोकण रेल्वेचा कायापालट कसा होतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

**देवस्थान इनाम जमिनीबाबत कायदा करणार**

# महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती

■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. २२ :** राज्यातील देवस्थान जमिनी या इनाम वर्ग ३ च्या असून त्या अहस्तांतरणीय आहेत. या जमिनीच्या प्रश्नासंदर्भात सर्वसमावेशक निर्णय घेण्यासाठी महसूल खात्याच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीच्या अहवालानंतर यासंदर्भात कायदा करण्याचे राज्य सरकारचे धोरण असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी विधानसभेत दिली.

देवस्थान इनाम जमीन संदर्भात भाजपच्या गोपीचंद पडळकर यांनी आज विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली होती. यावेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना बावनकुळे म्हणाले, सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीत स्थानिक आणि देवस्थान व्यवस्थापनाशी संबंधित व्यक्तींचा समावेश केला जाईल. देवस्थानाच्या जमिनी शेतकऱ्यांना मिळाव्यात अशी सरकारची भूमिका आहे. जमिनी वर्ग १ करण्याबाबतही सरकार सकारात्मक आहे. तसेच केंद्र सरकारच्या वक्फ बोर्ड कायद्याचा परिणाम देखील देवस्थानाच्या जमिनींवर होऊ शकतो. त्यामुळे त्या अनुषंगानेही विचार केला जात असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

देवस्थान इनाम जमिनीचे दोन प्रकार असून ज्या जमिनी देवस्थानला थेट दान करण्यात आल्या आहेत, अशा जमिनीला सॉइल ग्रँट म्हणतात. तर ज्या जमिनीबाबत जमिनीचा शेतसारा वसूल करण्याचे अधिकार देवस्थानांना दिले आहेत त्या जमिनींना रेव्हेन्यू ग्रँट असे म्हणतात, अशी माहितीही बावनकुळे यांनी दिली.

# मिनी बस दुर्घटनेची सखोल चौकशी करून कंपनीवर जबाबदारी निश्चित करा :आमदार रासने

**पुणे :** हिंजवडी मिनी बस दुर्घटनेची सविस्तर चौकशी करून कुटुंबाला न्याय द्यावा. सरकारने संबंधित कंपनीवर जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी आमदार हेमंत रासने यांनी केली. हिंजवडी फेज १ येथे बुधवारी सकाळी मिनी बसला भीषण आग लागून व्योमा ग्राफिक्स कंपनीतील चार जणांचा होरपळून मृत्यू झाला. आमदार हेमंत रासने यांनी विधानसभेत हा मुद्दा उचलून धरला. भविष्यात अशा बस दुर्घटना होऊ नयेत म्हणून प्रशासनाने सार्वजनिक आणि खासगी वाहतूक व्यवस्थेच्या सुरक्षिततेसंदर्भात आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा दुर्घटना टाळण्यासाठी ठोस पावले उचलावीत तसेच आग लागलेल्या संबंधित वाहनाची देखभाल आणि सुरक्षा तपासणी झाली होती का, याचाही सखोल तपास करण्यात यावा, अशी मागणी देखील यावेळी हेमंत रासने यांनी केली. हिंजवडी फेज वनमध्ये चालकाच्या पायाखाली अचानक आग लागली. त्यावेळी चालक आणि पुढचे कर्मचारी तातडीनं खाली उतरले. मात्र, मागचे दार न उघडल्याने चौघांचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना घडली. व्योमा ग्राफिक्स कंपनीचे एकूण १२ कर्मचारी या टेम्पोमध्ये प्रवास करत होते. या घटनेत बस जळून खाक झाली आहे. या बसमधून व्योमा ग्राफिक्स कंपनीचे एकूण १२ कर्मचारी प्रवास करत होते.

सध्या विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. या दुर्घटनेचे विधानसभेत पडसाद उमटले. आमदार हेमंत रासने यांनी सभागृहात हा मुद्दा लावून धरला. या प्रकरणाची सविस्तर चौकशी करावी.

कंपनीची जबाबदारी निश्चित करावी. मृतांच्या कुटुंबीयांना मदत द्यावी. भविष्यात अशा घटना घडू नयेत, याची खबरदारी घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

# दिशा सालियान प्रकरणी शिंदेंगटात मतभेद

■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. २२ :** दिशा सालियान प्रकरणी तिच्या वडीलांनी जी याचिका केली आहे, तो त्यांचा निर्णय आहे. त्या प्रकरणी सीआयडीने सांगितले आहे की यात कुठलाही राजकीय अँगल दिसत नाही. १४ व्या मजल्यावरुन पडल्याने तिचा मृत्यू झाला आहे, असे शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी म्हटले आहे.



संजय गायकवाड पुढे बोलताना म्हणाले की, शासनाच्या सर्व यंत्रणा जर राजकीय अँगल दिसत नाही असा रिपोर्ट देतात. त्यामुळे कोणावरही चिखल फेक करणे किंवा कोणाला फसवणे मला तरी योग्य वाटत नाही.

संजय गायकवाड म्हणाले की, ज्या वेळेला पोलिस यंत्रणांनी आदित्य ठाकरेंना सगळ्या प्रकरणातून क्लीन चीट दिली आहे. तर मला वाटते हायकोर्टातील याचिकेतून वेगळे काही बाहेर पडणार नाही. तिच्या कुटुंबियांना पोलिस यंत्रणेवर विश्वास नसावा म्हणून त्यांनी याचिका केली असेल.सीआयडीने तपास केला त्यावर त्यांना विश्वास नसावा. नीतेश राणे आणि नारायण राणे यांचा उद्धव ठाकरेंनी ज्या प्रकारे छळ केला, त्यामुळे ते संधी मिळाल्यावर ठाकरे कुटुबियांना सोडणार नाही. तो त्यांचा वैयक्तिक विषय आहे.

### औरंगजेबाचे प्रकरण सरकारच्या अंगाशी आले नाही

संजय गायकवाड म्हणाले की, औरंगजेबाचे प्रकरण सरकारच्या अंगाशी आले असे कोण म्हणते असे काही अंगाशी आलेले नाही. संजय राऊत बोलतात म्हणजे काही महाराष्ट्र बोलत नाही. त्यांची औकात काय आहे. ४ भितींच्या आत नालायकासारखी बकबक करणारा तो माणूस आहे. त्यांच्या बोलण्याला कोणी महत्त्व देत नाही. औरंगजेब हे प्रकरण एका विषयाचे नाही. हे शिवप्रेमींची देशभक्तांची भावना आहे. तो सरकारचा विषय नाही तो जनतेचा विषय आहे.

अमोल मिटकरी म्हणाले की, दिशा सालियन प्रकरणात इतक्या वर्षानंतर याचिका का दाखल करण्यात आली? २०२० साली मालाडमध्ये घडलेलं हे प्रकरण आहे. याची आता चर्चा होत आहे. इतक्या वर्षांनंतर ही याचिका दखल करण्याचे कारण काय? इतकी दिरंगाई का केली? तिच्या वडिलांनी तेव्हाच याचिका दखल केली असती, तर न्याय मिळाला असता. मग आता का हे प्रश्न काढले? असा सवाल मिटकरी यांनी उपस्थित केला आहे. तर दिशा सालियान प्रकरणात जे कोणी असतील त्यांना न्याय मिळाला पाहिजे. परंतु दिशा सालियान प्रकरणामुळे महाराष्ट्राची दिशाभूल होऊ नये. राज्यात औरंगजेबाच्या कबरीच्या मुद्द्यावरुन वातावरण भरकटवले जात आहे. हे महाराष्ट्र समोरचे प्रश्न नाहीत. राजकीय लोकांनी याला हवा देऊ नये. विरोधक आणि सत्ताधारी यांनी दिशा सालियन प्रकरणात महाराष्ट्राचे मूळ प्रश्नांना बगल देऊ नये.

### दिशा सालियान हिचा प्रथमदर्शनी खून – शिरसाट

दिशा सालियान हिची प्रथमदर्शनी खून झाला आहे. तिच्या वडीजांवर दबाव होता आता ते हायकोर्टात गेले आहेत. या प्रकरणात अनेक जण असल्याचे सिद्ध झाले आहे. पोलिसांकडून जलदगतीने तपास केला जाईल आणि आरोपीला शिक्षा होईल, असे मंत्री संजय शिरसाट यांनी म्हटले आहे.

# प्रभादेवीत २०० झाडे, अतिक्रमण काढलेल्या जागेवर वृक्षारोपण

■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. २२ :** अतिक्रमण काढल्यानंतर उपलब्ध झालेल्या जागेत हिरवळ फुलवण्याचा प्रयोग मुंबई महानगरपालिकेने केला आहे. प्रभादेवीतील एस. एल. मटकर मार्गावरील ३४ अनधिकृत बांधकामे हटविल्यानंतर या मार्गाचे रुंदीकरण करण्यात आले. त्याचबरोबर रस्त्यालगत उपलब्ध झालेल्या खुल्या जागेमध्ये विविध झाडांची दोनशेपेक्षा अधिक रोपटी लावून हा मार्ग हिरवागार करण्यात आला आहे.



मुंबई महानगरपालिकेच्या जी दक्षिण विभाग कार्यक्षेत्रातील प्रभादेवी परिसरात एस. एल. मटकर मार्ग हा एक प्रमुख रस्ता आहे.

या मार्गावरील पदपथालगत आणि रस्त्यालगतच्या अतिक्रमणांमुळे पादचाऱ्यांना या मार्गावरून चालताना गैरसोईचा सामना करावा लागत होता. त्यामुळे या३४ अनधिकृत बांधकामांबाबत कायदेशीर प्रक्रियेनंतर जानेवारी २०२५ मध्ये अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई करण्यात आली होती.

निष्कासन कारवाईअंती३४ बांधकामे हटविल्यानंतर एस. एल. मटकर मार्गाचे रुंदीकरण करण्यात आले. त्याचबरोबर रस्त्यालगत उपलब्ध झालेल्या खुल्या जागेमध्ये विविध पर्यावरणपूरक झाडांची दोनशेपेक्षा अधिक रोपटी शास्त्रशुद्ध पद्धतीने लावण्यात आली आहेत. या रोपट्यांची निवड करण्यासह ती लावण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान विभागाचे सहकार्यदेखील घेण्यात आले आहे.

या वृक्ष लागवडीमुळे परिसरातील हिरवाई वाढण्यासह परिसर प्रदूषणमुक्त होण्यास देखील मदत होणार आहे. वृक्ष लागवडीसह या खुल्या भूखंडावर एस. एल. मटकर मार्गालगत २ मीटर रुंदीचा काँक्रीटचा पदपथ बांधण्यात आला आहे. त्यामुळे पादचाऱ्यांना चालण्यासाठी मोठा पदपथ उपलब्ध झाला असून त्यावरून चालणाऱ्या पादचाऱ्यांना बहरणाऱ्या हिरवाईचाही अनुभव घेता येणार आहे. अनधिकृत बांधकामांवर कारवाई केल्यानंतर उपलब्ध होणारी जागा कधी विविध उपक्रमांसाठी वापरण्यात येते.

कधीकधी त्या जागेवर पुन्हा अतिक्रमण होते. तसे होऊ नये म्हणून अतिक्रमण निर्मूलनानंतर उपलब्ध झालेल्या जागेचा जी दक्षिण विभागाने पर्यावरणपूरक उपयोग केला आहे. ज्यामुळे एकेकाळी अतिक्रमणाने व्याप्त असलेल्या जागेवर तब्बल दोनशे पेक्षा अधिक झाडांची रोपे लावून सुंदर अशी हिरवळ फुलविण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

# मुंबईतील सर्व फलकांचे तीन महिन्यात लेखापरीक्षण

**मुंबई, दि. २२ :** मुलुंड टोल नाक्यावर लावण्यात आलेला फलक महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे (एमएसआरडीसी) असून मुंबई महानगरपालिकेची परवानगी घेण्याच्या अटीवर एमएसआरडीसीने एजन्सीला फलक लावण्याची परवानगी दिली होती. मात्र, संबंधित एजन्सीने महानगरपालिकेकडून परवानगी न घेताच फलक लावल्यामुळे महापालिकेने कारवाई केली आहे. त्यामुळे मुंबईतील सर्व फलकांचे समग्र लेखा परीक्षण तीन महिन्यांत पूर्ण केले जाणार असून, त्याबाबतचा अहवाल पुढील अधिवेशनात सादर करण्यात येईल, अशी माहिती मंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. मुंबई शहर आणि मुंबई उपनगरात जाहिरात फलक लावण्यासाठी मुंबई महानगरपालिकेची परवानगी बंधनकारक असताना मुलुंड येथील टोलनाक्याजवळ विनापरवाना फलक लावल्याबद्दल भाजपच्या अमित साटम यांनी प्रश्न विचारला होता. भाजपच्या योगेश सागर, पराग अळवणी यांनी यावेळी उपप्रश्न विचारले. या प्रश्नांना उत्तर देताना सामंत म्हणाले, मुलुंड टोलनाक्यावरील जाहिरात फलक महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) निविदा प्रक्रियेद्वारे उभारले आहेत.

## रेल्वे प्रशासनाच्या निष्काळजीमुळे कुंकू पुसले

**अकोला :** मलकापूर अंबिका नगरातील रहिवासी हर्षी हेमंत गावंडे यांनी २१ मार्च रोजी दक्षिण मध्य रेल्वेच्या स्टेशन प्रबंधकांकडे अर्ज दाखल केला. पतीच्या निधनामुळे कुटुंबाला आधार म्हणून नुकसान भरपाई तसेच नोकरी द्यावी अशी मागणी कुटुंबीयांनी केली आहे.१६. ०३.२०२५ रोजी रात्री ०९.०० वाजताच्या दरम्यान माझे पती हेमंत उमेश गावंडे, मी व माझा लहान मुलगा अकोट वरून रेल्वेने प्रवास करून अकोला स्टेशनवर पोहोचलो. तेव्हा रात्री ०९.०० वाजताचे दरम्यान एक अनोळखी इसमाने माझे मंगळसुत्र गळयातून हिसकावुन पळ काढला. त्यामुळे माझे पती इसमाच्या मागे धावले. काही वेळाने मला माहित पडले की, रेल्वे टर्फच्या बाजूला माझ्या पतीवर सदर इसमाने पेवर ब्लॉकच्या सहाय्याने चेह-यावर प्राणघातक हल्ला केला. त्यामुळे पतीस उपचारार्थ अकोला येथील खाजगी रुग्णालयात पोलिसांनी भरती केले.उपचारा दरम्यान १८.०३.२०२५ रोजी त्यांचा मृत्यू झाला. सदर घटनेवरून पो. स्टे. राम दास पेठ येथे त्या व्यक्ती विरुध्द माझ्या पतीचा खून केल्यासंबंधीचा गुन्हा दाखल झालेला आहे. सदरहु रेल्वे घटना प्रशासनाच्या निष्काळजीपणा व हलगर्जीमुळे घडलेली आहे. रेल्वे स्टेशनवर सुरक्षिततेसाठी आर. पी. एफ. किंवा जी.आरपीचे पोलिस हजर नव्हते. तसेच तिकीट कलेक्टर सुध्दा हजर नव्हते. रेल्वे प्रवाशांच्या दक्षतेसाठी रेल्वेने कोणतेही प्रबंध केलेले नव्हते. त्यामुळे माझ्या पतीचा जीव गेलेला आहे. त्यासाठी रेल्वे प्रशासन पूर्णपणे जबाबदार आहे. मी व माझे पती तिकीट घेऊन प्रवास करीत असल्याने आमची सुरक्षा करणे रेल्वे प्रशासनाची जबाबदारी होती. परंतु घटनेच्या दिवशी असे काहीही घडले नाही. त्यामुळे मृतकाच्या आश्रीतांना रेल्वे प्रशासनाद्वारे नुकसान भरपाई देण्यात यावी.

## बचत गटाची उत्पादने अव्वल दर्जाची : जिल्हाधिकारी अजित कुंभार

**▪अकोला,दि २२ (प्रतिनिधी):**

महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविले जाणारे उपक्रम महिलांना आर्थिक स्वावलंबी करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. महिला बचत गटांच्या सदस्यांनी विविध कौशल्ये आत्मसात करून उत्पादित केलेल्या अव्वल दर्जाच्या वस्तूंची ब्रॅण्डिंग, तसेच पॅकेजिंग गुणवत्तेसह वेगळेपण टिकवणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी येथे केले.

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या सुवर्णमहोत्सवी वर्धापनदिनानिमित्त महिला व बालविकास विभागाच्या सहकार्याने स्वराजभवन परिसरात आयोजित 'नवतेजस्विनी' प्रदर्शनाचे उद्घाटन करताना ते बोलत होते. जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक नयन सिन्हा, महिला व बाल विकासअधिकारी गिरीश पुसदकर, नाबार्डचे श्रीराम वाघमारे, माविम सहा. जिल्हा समनव्यय अधिकारी नीता अंभोरे, पोलिस निरिक्षक सुनील वायदांडे आदी उपस्थित होते.श्री. कुंभार यांनी महिला बचत गटांच्या स्टॉलला भेट



देऊन सदस्यांशी संवाद साधला व विविध उत्पादनांची माहिती घेतली.या तीनदिवसीय नवतेजस्विनी प्रदर्शनात ग्रामीण महिला भगिनींनी निर्माण केलेली उत्पादने अकोलेकरांना उपलब्ध होणार आहेत. प्रदर्शनीत १०० बचत गटांचा प्रदर्शनात सहभाग असून, एकूण ५० दालनांद्वारे रसायनविरहित, भेसळविरहित खाद्यपदार्थ, शोभिवंत वस्तू, दैनंदिन वापरासाठी उपयुक्त वस्तू अशा अनेक बाबी उपलब्ध होणार आहेत. हे प्रदर्शन दि. २३ मार्चपर्यंत रोज सकाळी १० ते रात्री १० वा. दरम्यान सर्वांसाठी खुले आहे. या तीन दिवसांत बचत गटांच्या उत्पादन विक्रीतून १५ लाखांहून अधिक उलाढाल अपेक्षित आहे.

ग्राहकांना महिला बचत गटांनी तयार केलेली रासायनिक रंग विरहित, उत्पादने ग्राहकांना उपलब्ध होणार आहेत. या उत्पादनामध्ये मायक्रोमच्या शोभिवंत वस्तु ,बांबूचे टोपले, वारली पेंटिंग, गोडंबी ,लोकरीच्या च्या शोभिवंत वस्तू, घरातील, देव्हाऱ्यातील शोभिवंत वस्तू, ज्वेलरी, मातीपासून बनविलेल्या वस्तू, झाडू, फडा, तसेच खाण्याचे स्वादिष्ट पदार्थ, आवळा पदार्थ, रेडीमेड ढोकळा पीठ, नाना प्रकारचे सुगंधी मसाले, सर्व प्रकारचे लोणचे, विविध प्रकारचे पापड व पापड मसाले, गोडंबी ,पॉपकॉर्न. केळीपासून बनविलेले चिप्स, सर्व प्रकारचे तृणधान्य/कडधान्य, सर्व प्रकारच्या डाळी आदी उपलब्ध राहील.

## परंडा गाव चे प्रभारी सरपंच यांना जीवे मारण्याची धमकी

**▪परंडा,दि २२ (प्रतिनिधी):**

या गावचे सरपंच गणेश नामदेवराव कोकाटे यांचा कडे प्र.सरपंच पद असून गेल्या दोन वर्षात गावात दोन कोटी च्या वर विकासकामे झाली असून, गावातील एक समाज कंटक उमेश सिदाजी कोकाटे हा गावात दारू,गांजा, वरलीमटका असे अनेक धंदे करत आहे.मी स्वतः त्या या कामाला विरोध केला असता त्याने मला जीवे मारण्याची धमकी दिली आहे.७०,०००रू खंडणी ची सुध्दा मागणी केलेली आहे.पैसे न दिल्यास तुला जिवाने मारून टाकेल असे कृत्य सरपंचा सोबत होत आहे.या विषयी मी मुख्य पोलीस अधिक्षक साहेबांना आणि बार्शीटाकळी पोलीस स्टेशनला




निवेदन दिले आहे.तरी आज रोजी सरपंच वर खुप प्राण घातक हल्ले होत आहे दोन सरपंचाचे जीव गेले आहे.त्यामुळे माझ्या परिवारात भयभीत करणारे वातावरण निर्माण झाले आहे.तरी परंडा गावातील हे अवैध धंदे लवकरात लवकर बंद करण्यात यावे व सरपंचाला सुरक्षितता देण्यात यावी अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## हातगावमध्ये घरफोडी २९ हजारांचा ऐवज लंपास!

### नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**▪अकोला,दि २२ (प्रतिनिधी):**

जिल्ह्यातील मुर्तीजापुर तालुक्या अंतर्गत येणाऱ्या शहर पोलीस स्टेशन हद्दीतील हातगाव शेत शिवार येथे २२ मार्चच्या रात्री १.३० वाजता अज्ञात चोरट्याने घरफ्फोडी करून सोन्याची पोत (८ ग्रॅम) आणि ५,००० रुपये रोख रक्कम असा एकूण २९,००० रुपयांचा ऐवज लंपास केला. फिर्यादी अरविंद मारोतीराव गि-हे (वय ५५) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, चोरट्याने घराचे उघडे दार पाहून आत प्रवेश केला. त्यानंतर बेडरूममधील लाकडी कपाटाचे लॉक आणि लॉकर तोडून चोरी केली.

या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अपराध क्रमांक १६४/२५ नुसार कलम ३०५ (ए), ३३१ (४) भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली एएसआय भांगे करत असून आरोपीचा शोध सुरू आहे.

## उष्मघात टाळण्यासाठी नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी: डॉ.आशिष गिऱ्हे

**▪अकोला,दि २२ (प्रतिनिधी):**

मार्च महिना संपून आपण एप्रिल महिन्यात प्रवेश करत आहेत परंतू एप्रिल, मे. आणि जून हा महीना उष्णतेचा लाटेच्या प्रार्दुभवामुळे धोक्याचा असते. या तीन महिन्यात आपल्या शहराचे तापमान अतिशय जलद गतीने उच्चतम बिंदु पर्यत पोहोचत असते. या तीन महिन्यामंध्ये उष्माघाताचे रुग्णांची संख्या अतिशय वाढून जात असते. तीव्र उष्माघातामुळे जीवीत हानीची भिती राहते. उष्माघाताने कुणाचाही मृत्यु होऊ नये याकरिता काही खबरदारीचे उपाय घेणे अत्यंत गरजेचे असते. वाढत्या उष्णतेच्या लाटेमध्ये गर्भवती माता, लहान बालके, वयोवृध्द व आजारी रुग्णांची विशेष काळजी घेतली पाहीजे.

काय करावे – कष्टाची कामे सकाळी अथवा सायंकाळी करावीत, पांढऱ्या व फिक्या रंगाची सेल व सुती कपडे वापरावेत, घराबाहेर



पडताना कानाला व डोक्याला रुमाल उपरणे बांधणे, अथवा टोपी वापरुन बाहेर पडणे, लहान बालकांना शक्यतोवर घरातच थंड जागी ठेवावे त्यांना उन्हात बाहेर फिरु देवु नयेत, जलसंजीवनी (जठड) चा वापर करावा, भरपुर पाणी प्यावे शक्यतोवर ताक, कैरी पन्हे, शरबत यांचे मुबलक प्रमाणात सेवन करावे, लघवीच्या रंगाकडे लक्ष दयावे रंग गडद झाल्यास वरील पदार्थाचे सेवन वाढवावे, वरील लक्षणे आढळून आल्यास ताबोडतोब उन्हातील काम थांबवून त्वरीत वैद्यकीय उपचार घ्यावे, प्रथम

**काय करु नये – वाढत्या तापमानात अति श्रमाची कामे करु नये, उष्णता शोषुन घेणारे काळया व भडक रंगाचे घट्ट कपडे वापरू नयेत, विनाकारण घराबाहेर पडू नये, खुप गरज असेल तरच घराबाहेर पडावे, उघडया डोक्याने घराबाहेर पडु नये.**

**उष्मघाताची लक्षणे – कडक ताप येणे, गोंधळुन जाणे, बैचेनी वाढणे, थकवा येणे, हृदय व श्वासाची गती वाढणे, रक्तदाब वाढणे, डोके दुखणे, मांसपेशींमध्ये अकडावा येवून वेदना होणे, घशाला कोरड पडणे, जिभ जाड जाणवणे, अतिशय थकवा जाणवणे, त्वचा कोरडी होणे/लाल होणे, चक्कर येणे, बेशुध्द होणे आदिं प्रमाणे आहे.**

ोपचार म्हणुन थंड पाण्याच्या पटटया ठेवाव्यात व त्वरीत रुग्णाला नजीकच्या आरोग्य केंद्रात न्यावेत असे आवाहन मनपा वैद्यकीय आरोग्य

## अशोक वाटिका चौकात खांब कोसळला



अशोक वाटिका चौकात नव्याने लावण्यात येत असलेला कॅमेऱ्यासाठी लावण्यात आलेला खांब अज्ञात वाहनाच्या धडकेने कोसळला

## थोडक्यात

### शीतला मातेच्या मंदिरात जाऊन पूजा

**अकोला:** कुटूंबातील प्रत्येक सदस्याचे आरोग्य चांगले राहण्यासाठी शुक्रवारी घरोघरी शीतला सप्तमी साजरी करण्यात आली. देवी मातेच्या प्रसन्नतेसाठी विशेषतः हिंदी भाषिकांनी हा सण उत्साहात साजरा केला. शीतला सप्तमी हा सण देवी शीतला मातेला समर्पित आहे, जी शीतलता आणि आरोग्याची देवी म्हणून ओळखली जाते. हा सण विशेषतः उत्तर भारतात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. शीतला मातेला स्वच्छतेची देवी मानले जाते. त्यांची पूजा केल्याने कुटुंबात आरोग्य आणि स्वच्छता राहते. हा सण उन्हाळ्याच्या सुरुवातीचे प्रतीक आहे, आणि शीतला मातेची पूजा करून शीतलता आणि शांतीची कामना केली जाते. या दिवशी, शिळ्या अन्नाचा अर्थात एक दिवस आधी बनवलेला नैवेद्य दाखवला जातो, ज्याला 'बासोडा' म्हणतात. ही परंपरा उन्हाळ्यात शिळे अन्न खाणेटाळण्याचे महत्त्व दर्शवते. शीतला सप्तमीच्या दिवशी महिला उपवास करतात आणि कुटुंबाच्या कल्याणासाठी प्रार्थना करतात. शीतला सप्तमी हा एक महत्त्वाचा सण आहे जो आपल्याला स्वच्छता, आरोग्य आणि निसर्गाबद्दल जागरूक राहण्याची प्रेरणा देतो.

### आंतरविद्यापीठ बुद्धिबळ स्पर्धेत संस्कृती वानखडे व संघाने पटकावले कांस्य पदक

अकोलाः १८ ते २० मार्च २०२५ दरम्यान दिल्ली येथे ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी वूमेन्स टिम चेस चॅम्पियनशिप झाली. स्पर्धेत संस्कृती वानखडे व तिच्या संघाने कांस्य पदक पटकावले. या स्पर्धेत देशातून निवड झालेल्या युनिव्हर्सिटीचा सहभाग होता.डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगरतर्फे संस्कृती वानखडे व तिच्या टिमची भोपाळ येथे झालेल्यास्पर्धेतून निवड झाली होती. स्पर्धेत एकूण पाच डाव खेळण्यात आले. संस्कृतीच्या टिमने पहिल्या डावाल पंजाब युनिव्हर्सिटीच्या टिमवर सहज विजय मिळविला. तसेच दुसऱ्या डावातही दिल्ली विद्यापीठाला सहज नामोहरम केले. परंतु तिस-या डावात युनिव्हर्सिटी ऑफ मद्रासच्या टिमसोबत कडवी झुंज द्यावी लागली आणि बरोबरीला सामोरे जावे लागले. चौथ्या डावात तमिळनाडूच्या युनिव्हर्सिटीसोचत पराभव पत्करावा लागला. अंतिम म्हणजे पाचव्या डावात युनिवर्सिटी ऑफ मुंबईचा पराभव करून संस्कृतीच्या टिमने माणजेच छत्रपती संभाजीनगरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा युनिव्हर्सिटीने कांस्य पदकावर नाव कोरले. डॉ. बाबासाहेब आबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगरच्या टिममध्ये संस्कृती वानखडे, भागयश्री पाटील, तनिषा बोरामणीकर, सानिया तडवी, साचल बियाणी व संघमित्रा बोदडे या महिला खेळाडूंचा सहभाग होता.

## जेष्ठ पत्रकार विठ्ठलराव महल्ले यांच्यावर प्राणघातक हल्ला

### ▪आरोपींना अटक करुन कठोर कारवाईची मागणी

**▪मुर्तिजापुर,दि २२ (प्रतिनिधी):**

अकोला येथील जेष्ठ पत्रकार विठ्ठलराव महल्ले यांच्यावर १९ मार्च रोजी रात्री प्राणघातक हल्ला करण्यात आला. खदान पोलीस स्टेशन परिसरातील एस.टी. वर्कशॉपच्या मागील रस्त्यावर ३ ते ४ युवकांनी त्यांना अडवून बेदम मारहाण केली. या हल्ल्यात महल्ले गंभीर जखमी झाले असून त्यांच्या हेलमेटचे तुकडे झाले.

या अमानुष घटनेच्या निषेधार्थ मुर्तिजापूर तालुक्यातील पत्रकारांनी एकत्र येत आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाईची मागणी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मा.तहसीलदार शिल्पा बोबडे यांच्या माध्यमातून निवेदन देण्यात आले.

पत्रकार महल्ले हे सामाजिक प्रश्नांवर स्पष्ट आणि परखड मत मांडत असल्याने हा हल्ला नियोजित होता का, याचा सखोल तपास करून सूत्रधारांना उघड करावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी पत्रकार संरक्षण कायद्याची कठोर अंमलबजावणी करावी, असा आग्रह व्यक्त करण्यात आला.हल्लेखोरांना लवकरात लवकर अटक न केल्यास



तीव्र आंदोलनाचा इशाराही पत्रकारांनी दिला आहे. या वेळी प्रा. अविनाश बेलाडकर, दीपक अग्रवाल, प्रा. दीपक जोशी, जिल्हाध्यक्ष ग्रामीण पत्रकार संघ विलास नसले, संतोष माने, मिलिंद जामनिक, गौरव अग्रवाल,अंकुश अग्रवाल, रोहित सोळंके, अजय प्रभे, श्याम वाळस्कर, प्रतीक कुरेकर, सुमित सोनवणे, दीपक थोरात, विलास वानखडे, श्याम काकडे, धन्या सपकाळ, नागोराव तायडे आदी पत्रकार उपस्थित होते.

## आक्षेपार्ह पोस्टकडे सायबर सेलकडून दुर्लक्ष

**▪अकोला,दि २२ (प्रतिनिधी):**

राजकीय पक्षाचे सोशल मिडिया हाताळणारे बहादर आपल्या आकांना खुश करण्यासाठी वाटेल त्या आक्षेपार्ह पोस्ट फेसबुक, इंस्टाग्राम वांसारख्या सोशल मीडियावर व्हायरल करीत आहे. या पोस्ट सामान्य नागरिकांना दिसून येत आहे मात्र अकोला पोलिस दलाच्या सायबर सेलकडून यांसारख्या पोस्टकडे पूर्व दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. शुक्रवारी शहरातील एका नवनिर्वाचित आमदाराचा फोटो टाकून त्याची अब्रू नुकसान व्हावी, समाजात प्रतिमा मलिन होऊन मतदारांना मध्ये त्याच्याविषयी चीड निर्माण व्हावी अश्या प्रकारची पोस्ट एका राजकीय पक्षाच्या ऑफिशियल पेजवर




टाकण्यात आली आहे. विशेष म्हणजे ही सर्वत्र सोशल मीडियावर व्हायरल होत असून अकोला पोलिस दलाच्या सायबर सेलला मात्र दिसली नसल्याने नानाविध प्रकारचे प्रश्न उपस्थित होत आहे. राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असून शुक्रवारी तिसरा आठवडा संपुष्टात आला आहे. या तिन्ही आठवड्यात सदर आमदाराने शहरातील विविध समस्यांना अनुसरून लक्षवेधी, तारांकित प्रश्न सभागृहात उपस्थित करीत आपल्या कर्मठतेचा परिचय एकप्रकारे मतदारांना करवून दिला.

## प्रतीक्षा वानखडे चित्रकला स्पर्धेत प्रथम

**▪माझोड,दि २२ (प्रतिनिधी):**

प्रतीक्षा प्रशिक वानखडे हीने चित्रकला रंगभरण स्पर्धेत



प्रथम क्रमांक पटकावला आहे. सदर स्पर्धा जिजाऊ बहुउद्देशिय सामाजिक शिक्षण व प्रशिक्षण संस्था अकोला यांच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत माऊंट कारमेल स्कूल बोरगाव मंजू ची विद्यार्थिनी प्रतीक्षा वानखडे हीने चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे.

## शासन निर्णयाचा संदर्भ देऊन नोकर भरतीला स्थगिती द्यावी

### भूषण गोपनारायण यांची पत्रकार परिषदेत मागणी

**▪अकोला,दि २२ (प्रतिनिधी):**

डॉ. पंजाबरावं देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथे शासन निर्णय क्र. कृषी वि -३७२३/प्र. क्र. १६९ /६ ए दि. १४ ऑक्टोबर २०२४ या शासन निर्णयाचा संदर्भ देऊन निघालेल्या नोकर भरती संदर्भात कृषी शिक्षण व संशोधन परिषद पुणे महा संचालक यांचे आदेशान्वये चौकशी समिती गठीत झाली आहे. त्यामध्ये सन २००१ ते २००४ पर्यत बंद केलेले प्रकल्प ग्रस्त एकाच कुटुंबातील ३ ते ४ युवकांना प्रकल्प ग्रस्त म्हणून नोकरीत स्थायी करून घेतले आहे. ज्यांची शेती विद्यापीठात गेली आहे. याबाबत चौकशीझाली असून चौकशी अधिकारी यांनी संबंधित चौकशी मध्ये उच्च स्तरीय चौकशी समिती ची शिफारस केली आहे. त्यामुळे संबंधित नोकर भरती निघण्याच्या आधी २० डिसेंबर २०२४ रोजी हिवाळी अधिवेशन नागपूर येथे मुख्य सचिवालय तसेच कृषी सचिव यांना निवेदन देऊन १४ ऑक्टोबर २०२४ रोजी पारित शासन निर्णया ची पुनरतपासणी व कृषी परिषद मार्फत चालू असलेली चौकशी पूर्ण होईपर्यत संबंधित आदेशाला स्थगिती देण्यात यावी.

## संत जनाबाई ही संतांची काशी– हभप अशोक महाराज इलग शास्त्री

### गायत्री नगरच्या कीर्तन महोत्सवात 'धरिला पंढरीचा चोर'..भक्तिमय अभंगाचा जल्लोष

**▪अकोला,दि २२ (प्रतिनिधी):**

वारकरी संप्रदायात संत जनाबाई यांचे मोठे स्थान मानले जाते.संत जनाबाई या संत विश्वाची काशी असून साक्षात विठ्ठल ज्यांना आंघोळ घालीत असे अशा पावन जनाबाई महाराजांच्या भेटीला साक्षात कबीर हे काशीवरून पंढरपूरला येतात. अशा पावन जगतकल्याणी संत जनाबाईच्या भागवत सेवेची पावती साक्षात विठ्ठल देत असून भक्ती कशी करावी हे संत जनाबाई यांचे चरित्र शिकवत असल्याचा हितोपदेश हभप अशोक महाराज इलग शास्त्री यांनी केला.श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज बिजोत्सव सेवा समिती, गायत्री नगर, कौलखेडच्या वतीने गायत्री नगरच्या प्रांगणात सुरू असलेल्या किर्तन महोत्सवात शेवगाव अहिल्यानगर येथील कीर्तनकार हभप अशोक महाराज इलग शास्त्री यांनी कीर्तनाचे सहावे पुष्प सादर केले.

त्यांनी या सत्रात संत जनाबाई यांचा 'धरिला पंढरीचा चोर,गळा बांधोनीया दोर-'या अभंगावर सुंदर कीर्तन सादर केले.म्हणाले, भारतीय संस्कृतीत पराकोटीच्या स्त्री संत होऊन गेल्या आहेत. त्यामध्ये गार्गी, मैत्रेयी, मुक्ताई,कानोपात्रा, जनाबाई,मीरा,रुक्मिणी अशा अनेक महिला संत आहेत. भगवत भक्ती कशी असते हे जगाला



अशा स्त्री संतांनी दाखविली असून अशा स्त्री संतांनी परमार्थात मोठी क्रांती केली असल्याचे हभप अशोक महाराज ईलग यांनी यावेळी सांगितले.ते म्हणाले,भक्ती कोणाकडे बघून करावी हा प्रश्न नारदाला भक्तीच्या संदर्भात विचारण्यात आला. तर नारद यांनी भक्ती गोपिकांकडे बघून करावी असे म्हटले आहे.कारण स्त्री असलेल्या गोपिका या प्रेमाचा सागर आहेत. अशा भक्त गोपिकांचे वर्णन खुद्द संत कबीरांनी केले आहे. संत कबीर हे महाराष्ट्रातही आले होते.यावेळी त्यांनी संत कबीर व जनाबाईच्या भेटीचा प्रसंग आपल्या कीर्तनात सादर केला. संत जनाबाई या संत नामदेवाच्या घरी विठ्ठलाची भक्ती करायच्या.अशा भक्ती परायण जनाबाईला स्वतः विठ्ठल आंघोळ घालीत असत. जनाबाई देवाला शिव्यांची लाखोली वाहत आणि देव या शिव्याची लाखोली खाता खाता डोलत असल्याचा प्रसंग ही त्यांनी यावेळी सांगितला. ते म्हणाले, जगात अनेक परमार्थ करतात. मात्र मला देवच पाहिजे अशी कामना केवळ संत जनाबाईच करू शकते.अशी कामना करणे हा भावदेव असल्याचे त्यांनी सांगितले.त्यांनी यावेळी भावसंधी,भावसाफल्य व भावशांती या भक्ती प्रकाराची ही माहिती दिली.

ते म्हणाले, काहींना संसार करावा वाटतो मात्र परमार्थ करावा वाटत नाही. तर काहींना परमार्थही संसारा सोबत करावा वाटतो. सांगा मी काय करू, भक्ती करू का पोट भरू ? हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात असतो.मात्र संसाररूपी विश्वात परमार्थ हा आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.परमार्थाशिवाय हे जग, हे आयुष्य शून्य आहे. किंबहुना हा परमार्थ खऱ्या अर्थाने पुरुषार्थ असल्याचे त्यांनी सांगितले. ज्याला देव धरता आला तो खरा पुरुषार्थ असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. या सत्रात धरीला पंढरीचा चोर, गळा बांधुनिया दोर हा अभंग उपस्थित महिला, पुरुषांनी सादर करीत किर्तन उत्सवात जल्लोष साकार केला.सत्रात सर्वप्रथम समितीच्या वतीने हभप अशोक महाराज इलग यांचे स्वागत करण्यात आले. नित्य रात्री ८ ते रात्री १० वाजेपर्यत चालणाऱ्या या कीर्तन महोत्सवात आज दि २३ मार्च रोजी वारी भैरवगड येथील हभप ज्ञानेश्वर महाराज वाघ यांचे कीर्तन होऊन सोमवार दि २४ रोजी सायं ५ वाजता परिसरात गाथा दिंडी होऊन साय ७ वाजता इलोरा येथील हभप तुकाराम महाराज सखारामपूरकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने या कीर्तन महोत्सवाचे समापन होणार आहे.या कीर्तन महोत्सवात समस्त महिला पुरूषांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज बीजोत्सव सेवा समिती,गायत्री नगर कौलखेड च्या समस्त पदाधिकारी व सेवाधाऱ्यानी केले.

# माणुसकीचा 'धर्म' शोधणारी माणसं सापडतील का?

एका बाजूला देशातील न्यायमूर्ती महाशय अतिशय वास्तव निर्णय देत आहे, तर दुसऱ्या बाजूला महाराष्ट्राच्या विधानसभेत बसलेल्या लोकांच्या मनात काय चालू आहे, ते स्पष्ट झाले.

सनातन धर्माला आम्ही स्विकारणार नाही, त्याला कायम विरोध करणार, असे काही सदस्य बोलताच भाजपाच्या आणि शिंदे गटाच्या सदस्यांनी 'सनातन धर्म की जय हो', अशा घोषणा दिल्या होत्या होत्या. भाजपच्या लोकांनी घोषणा दिल्या हे एक वेळ समजू शकतो; परंतु शिंदे गटाला धर्म व सनातन धर्म म्हणजे काय यातील फरक तरी समजू शकतो का? कारण ते ज्या विचारसरणीतून बाहेर पडले ते एका वेगळ्या भूमिकेत आहे. तेथे धर्माचा नव्हे तर सत्तेचा संबंध आलेला आहे.

अनेकांना सनातन धर्म मान्यच नाही. सनातन धमार्ला पहिल्यांदा आव्हान बुद्धांनी दिले व माणूसकीचा ऱ्हास होतो म्हणून सनातन धर्म मान्य नाही, अशी बुद्धांची व त्यानंतर महावीर जैन यांची भूमिका होती. सनातन धमार्तून बाहेर जाऊन बुद्ध धमार्ची आणि जैन धमार्ची स्थापनाच विद्रोहातून झाली. तीच भूमिका अनेक संत व महात्म्यांनीही घेतली.

बसवेश्वर महाराजांनी देखिल सनातन धमार्ला विरोध केला आणि लिंगायत धमार्ची स्थापना केली. त्यानंतर चक्रधर स्वामींनी साहित्य लिहीत उघडपणाने सनातन धमार्ला विरोध केला आणि महानुभव पंथ स्थापन केला. संत परंपरेतील सगळ्याच संतांनी सनातन धर्म आणि कर्मकांडांना विरोध करणारी भूमिका घेतली. सावता माळी, चोखामेळा, संत गोरा कुंभार, संत तुकाराम, संत एकनाथ, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज अशा कितीतरी सन्माननीय संतांची नावे घेता येतील.

सनातन व्यवस्थेवर मात करीत पहिल्यांदा स्वराज्य धर्म स्थापन करण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराजांनी केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या निवार्णानंतर छत्रपती संभाजी महाराजांना छळण्याचे काम कुणी केले, हे सांगण्यासाठी ज्योतिषाची गरज नाही. पेशवाई लोप पावल्यावर महात्मा जोतिबा फुलेंच्या लिखाणातून, त्यांच्या विचारातून सनातन्यांना टोकाचा विरोध होऊ लागला.

महात्मा फुलेंनी वेगळी भूमिका घेवून शिक्षणाचे दरवाजे महिलांसाठी उघडे केले. 'स्त्री शिकली तर घर शिकेल' या भूमिकेतून त्यांनी समाजात विद्रोह केला. स्वतःच्या पत्नीलाच स्त्री शिक्षणासाठी बाहेर काढले. फुले दाम्पत्याला मारण्याचा कटदेखिल शिजविण्यात आला होता. त्यांच्यावर अनेक हल्ले झाले. पण, स्वतः त्यांनी कधीही हार







मानली नाही. आज देशात ज्या शिकलेल्या स्त्रीया दिसत आहेत; त्या कुठल्याही जाती धर्माच्या असो, त्याचे एकमेव कारण म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले होय.

त्यानंतर जगातील पहिले आरक्षणाचे काम छत्रपती शाहू महाराजांनी केले. त्यांनी देखिल सनातनी व्यवस्थेला तीव्र विरोध केला. पण हे सगळं घडत असतांना अनेक ब्राम्हण्यवादाच्या विरोधात असलेल्या ब्राम्हणांनी छत्रपती शाहू महाराजांना साथ दिली हे महत्वाचे आहे.

याठिकाणी एकच नमूद करावेसे वाटते की, समाजाच्या हितासाठी धर्म व राजकारण वेगळे झाले पाहिजे, त्याशिवाय काही चांगले घडणार नाही. सर्व धर्मामधील चांगल्या गोष्टी एकत्र करण्याची गरज असून त्यातून निश्चितपणे चांगले परिणाम साध्य होतील. बहुतेक राष्ट्रे एकधर्मी तर आपण बहुधर्मी आहोत.

जात, धर्म या गोष्टी आपल्या इच्छेविरुद्ध तसेच संमतीशिवाय होत असतात. आपली त्याकडे पाहण्याची दृष्टी समानतेची हवी. माणसाला माणसाशी जोडतो तो धर्म आणि तोडतो तो अधर्म होय. सर्व धमार्तील चांगल्या गोष्टी एकत्र केल्यास चांगले परिणाम साधले जातील.

बहुतेक सर्व धर्माची निर्मिती होऊन आज शेकडो वर्षे उलटली आहेत. या धर्माची तत्वे, नियम, आचारविचार तयार होऊनही तेवढीच वर्षे उलटली. या मधल्या काळात या साऱ्यांमध्ये अनिष्ठ रूढींचाही शिरकाव झाल्याने गोंधळ निर्माण झाला आहे.

हिंदू धर्म हा सहिष्णूतावादी, सर्वसमावेशक, अहिंसक म्हणून ओळखला जात होता. पण या धर्मातही उजव्या धर्मांध शक्तीचा शिरकाव झाला आहे. दहशतवाद आणि धार्मिक असहिष्णुता ही धर्म सुधारणेपुढील दोन महत्त्वाची आव्हाने आहे. धर्माच्या नावाने राजकारण होऊ नये.

धर्मग्रंथांचा नव्याने अर्थ लावणे आवश्यक आहे. धमार्ने पोथीपुराणात अडकून पडू नये. धर्माच्या प्रेरणेने सामाजिक सुधारणा व्हाव्यात. शेकडो वर्षापूर्वी तयार झालेल्या धर्मात कालपरत्वे बदल झाले पाहिजेत, हीच अपेक्षा!

■ ■ ■




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

## लोकांनी विश्वास तरी कुणावर ठेवावा?

स्वराज्याचे सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या घराण्यातील भगिनींना ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे काही वर्षांपासून त्रास देत होते. २०१६ मध्ये आमदार असताना स्वतःचेच नग्न फोटो पाठवत होते. तेव्हा गोरेंना दहा दिवसांची जेल देखील झाली होती. न्यायालयाने गोरेंवर 'जनावरांवर भुंकणारा कुत्रा' अशी टिपण्णी केली होती. जयकुमार गोरेंनी या भगिनींची न्यायालयात माफीही मागितली होती. तसेच भविष्यात माझ्याकडून कोणताही त्रास होणार नाही असे लिहून दिले होते.

देवेंद्र फडणवीसांनी लाडक्या जयकुमार गोरेंना ग्रामविकास मंत्री केल्यानंतर पुन्हा या भगिनींला त्रास सुरु झाला होता. या भगिनीच्या नावाने एक पत्र माध्यमांवर व्हायरल करून बदनामी केली गेली. तीच महिला आता एक कोटीची खंडणी घेतांना पकडली गेली. १७ मार्चपासून विधान भवनासमोर आमरण उपोषण करणार असल्याचे या भगिनीने राज्यपालांना कळवले होते. मग आता लोकांनी विश्वास तरी कुणावर ठेवावा? राज्यात सतत महापुरुषांची बदनामी, जातीयवाद, रोज बलात्कार, हत्या होत आहेत, पीडितांना न्याय मिळत नाही. किरीट सोमय्या, धनंजय मुंडे, जयकुमार गोरे असे आमदार आणि मंत्रीच लाज-लज्जा, मर्यादा सोडून भ्रष्टाचार, गुंडगिरी, व्यभिचार करीत आहेत. यात महाराष्ट्राची हानी होत आहे. राज्यात कायदा व सुव्यवस्था आहे का? असा प्रश्न जनतेला पडत आहे. किरीट सोमय्या या नेत्यानंतर लज्जा उत्पन्न होणारी ही दुसरी घटना. तर त्यांच्याकडून प्रेरणा घेवून पुण्यातील एका रईस बापाच्या पोरानेही तोच उद्योग केला. देवेंद्र फडणवीसांना राज्य सुरळीत ठेवायचे असेल, तर निष्पक्षपातीपणे कायदा सुव्यवस्थेची अंमलबजावणी करावी लागेल. जनतेत विश्वास तयार करावा लागेल. अन्यथा असेच सुरू राहिले, तर श्रीलंका आणि बांगलादेश प्रमाणे जनतेचा उद्रेक अटळ आहे.

## अशी माणसं पून्हा राजकारणात सापडतील?

यशवंतराव चव्हाण यांची एक लै मजेशीर पण हृदयस्पर्शी आठवण आहे. त्यांची आई विठाई ही कष्टकरी मजूर महिला होती नवऱ्याच्या निधनांनंतर अतिशय हलाखीच्या परिस्थितीत तिने यशवंताला लहानाचे मोठे केले. पोरानेही या कष्टाची बूज राखली. मन लावून शिकला. आधी स्वातंत्र्य लढ्यात सक्रिय सहभाग होता. नंतर थेट आमदार, मंत्री, मुख्यमंत्री ते थेट उपपंतप्रधान पदापर्यंत मजल मारली. बावन्न साली पहिली विधानसभा निवडणुक जिंकल्यावर मोरारजी देसाईंच्या मंत्रीमंडळात यशवंतराव नागरी पुरवठा आणि समाज कल्याण मंत्री झाले. मुंबईला रहायला आले. येताना त्यांनी आईलाही सोबत आणले. मंत्रीपद असल्यामुळे साहेबांना चोवीस तास पोलीस संरक्षण होते. विठाईनं एकेकाळी पोरगा स्वातंत्र्य लढ्यात भुमिगत झालेले दिवस पाहिले होते. ब्रिटीश राजवटीतले पोलीस यशवंताचा शोध घेण्यासाठी घरी येऊन झडती घ्यायचे. वाट्टेल तसे बोलायचे अपमान करायचे. आज आपले पोरग एवढे मोठे झालेय की, पोलीस अधिकारी येता जाता त्याला सलाम करतात हे बघून तिला पोराचे खूप कौतिक वाटायचे. डोळे भरून हा रूबाब ती बघत रहायची. एक दिवस मध्यरात्री विठाबाईंना जाग आली.परत झोपच लागंना म्हणून त्या सहज चालत बाहेरच्या दारापर्यंत आल्या. तिथे बाहेर दोन पोलीस पहारा देत होते. विठाबाई मायेने त्यांना म्हणाल्या "आरं लेकरांनू का उग ताटकळत उभे ऱ्हायलाय? येसवंता कवाच झोपला तुमीबी झोपा आता". पोलीसांना काय करावे कळेना "हो हो" करत उभेच राहिले. विठाबाई लगबगीने आत गेल्या. घरातल्या काही जणांना उठवले आणि सांगीतले "भाईर ती लेकरे बिचारी ताटकळत उभी ऱ्हायलीत, त्यास्नी सतरंजी, चादर, उशीबिशी न्हिऊन द्या, झोपा म्हणावे आता" घरात काही तरी गोंधळ सुरूय हे जाणवून यशवंतराव जागे झाले व बाहेर आले. सगळा प्रकार त्यांच्या लक्षात आला. ते हसून त्या पोलिसांना म्हणाले "झोपा आता तुम्ही झोपल्याशिवाय आमची आई झोपणार नाही झोपा झोपा".

असे राजकारणी या महाराष्ट्राने पाहिलेत ज्याचा धर्म एकच होता 'माणुसकी'. अशा नेत्यांमुळेच आपले बापजादे शांत समाधानी समृद्ध आयुष्य जगले. आजच्या या भ्रष्ट नेत्यांनी राजकारणच नव्हे तर सर्वसामान्य माणसाचे जगणे नासवलं आहे. पण त्यांना हे कळत नाही की, त्यामुळे त्यांचे स्वत:चेही आयुष्य बरबाद झालेय. रस्त्यावरचा टायर फुटला तरी आपल्याला मारायला कुणीतरी बॉम्ब फोडला असे समजुन भेदरून रात्र जागवावी लागते त्यांना. यांनी कितीबी जाहिरातबाजी करून स्वत:ला वाघ ठरवू द्या. यशवंतराव चव्हाणांसारखे आपल्या प्रोटेक्शनला असलेल्या पोलीसांना 'आता झोपा' असे सांगायला निर्मळपणा, बिनधास्तपणा आणि वाघाचे काळीज लागते, ते आताच्या नेत्यांकडं नाही. गरिबीतून वर आलेली आणि गरिबीची जाण असलेली व्यक्ती कितीही यशस्वी झाली, तरी हाताखाली काम करणाऱ्या कुणाशीही वागताना कायम 'माणूस' म्हणून वागते असे म्हणतात. ज्या घरात धुणीभांडी करणारी बाई अनेक वर्ष टिकते, त्या घराची मालकीण माणुसकी जपणारी असते असे समजावे. एका बाजूला निधर्मीवादी राष्ट्र म्हणून आपण शपथ घेतो. तर दुसऱ्या बाजूला 'वसुधैव कुटुंबकम' मानणारा हिंदू धर्म आम्ही मानतो. धर्मवाद्यांनी खूपच स्तोम माजविल्यानंतर प्रत्येक धर्माचे धर्मवेढे धर्माचा समावेश थेट राजकारणात करतात व धर्माच्या माध्यमातून अनर्थ घडवितात. भारतीय राजकारणाचा तर सध्या पोतच बिघडलेला आहे. आताची वैचारिक पातळी कमालीची ढासळली असल्यामुळे कोणी कोणाकडे लक्ष द्यायला तयार नाही. तत्व व मूल्यांना फाट्यावरच मारले जात आहे. धर्मनिरपेक्ष लोकशाहीत भारतात समता, स्वातंत्र्य, बंधुत्व व न्याय या तत्त्वांचे पालन अपेक्षित आहे. पण ही अपेक्षापूर्ती होतच नाही. मानवतेला कलंक असलेला मनुस्मृतीचा सनातन धर्म कुणालाच नको आहे, पण ज्यावेळी भाजपाचे आमदार राम सातपुते जे मागासवर्गीय आहेत, त्यांनी 'सनातन धर्म की जय हो' अशी घोषणा महाराष्ट्राच्या विधानसभेत दिली, त्यावेळी सभागृहातील अनेक हुशार व जाणकार मनातल्या मनात हसत असतील. पण आपण करणार तरी काय? मध्यंतरी सर्वोच्च न्यायालयाने एक निर्णय देतांना न्यायमूर्ती जोसेफ आणि न्यायमूर्ती नागरत्न यांनी देशामध्ये वाढलेली धर्मांधता आणि त्यामुळे खराब झालेले देशातील वातावरण, समाजव्यवस्था याबद्दल बोलतांना स्पष्टपणाने नमूद केले की, हा देश धर्मनिरपेक्ष आहे. निष्कारण नको ते मुद्दे काढून देशातील वातावरण खराब करु नका. तुमच्यामुळे देशामध्ये द्वेष वाढतोय, अशी समज त्यांनी याचिकाकर्त्यार्ला दिली. सर्वोच्च न्यायालयाने आपले असे मतं नोंदवले व न्यायाबद्दल असलेला सन्मान अधिक वृध्दींगत झाला.

# वतन पर मिटने वालों का...

भगत सिंह एक भारतीय क्रांतिकारक होते. हिंदुस्थानातील ब्रिटिश साम्राज्याविरुद्धच्या लढ्यात त्यांनी केलेल्या दोन शोर्य कार्यांमुळे वयाच्या २३व्या वर्षी त्यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. डिसेंबर १९२८ मध्ये, भगत सिंह आणि त्याचे सहकारी, शिवराम राजगुरू यांनी २१ वर्षीय ब्रिटिश पोलीस अधिकारी जॉन सॉंडर्सला लाहोर येथे गोळ्या घालून ठार मारले. जेम्स स्कॉट ह्यांना ठार मारण्याचा हेतू असताना चुकून सॉंडर्स बळी पडला. पोलीस अधीक्षक जेम्स स्कॉट याने हिंदुस्थानातील लोकप्रिय राष्ट्रवादी नेते लाला लजपत राय ह्यांच्यावर लाठी चार्जचा आदेश देऊन त्यांना जबर जखमी केले. त्यामुळे लाला लजपत राय दोन आठवड्यांनंतर मरण पावले. त्यांच्या मृत्यूचा बदला म्हणून भगतसिंगांनी स्कॉटला मारण्याचा बेत केला होता. त्याच्या या कटात चंद्रशेखर आझाद व शिवराम हरी राजगुरू सहभागी होते. त्यानंतर भगत सिंह व राजगुरू यांचा शोध घेत असल्याचे पाहून चंद्रशेखर आझाद ह्यांनी चानन सिंघ नावाच्या भारतीय पोलीस अधिकाऱ्याला मारले.

-------------

भगत सिंहचा जन्म २८ सप्टेंबर, १९०७ रोजी तत्कालीन पंजाब प्रांतातील ल्यालपूर जिल्ह्यातील बंगा गावात झाला. त्याच्या आईचे नाव विद्यावती व वडिलांचे नाव किशन सिंह होते. ज्यावेळेस त्याच्या वडिलांची व दोन काकांची तुरुंगातून सुटका झाली, त्याच सुमारास भगतसिंगांचा जन्म झाला. त्यांच्या कुटुंबातील बरेच सदस्य भारतीय स्वातंत्र्यआंदोलनात सामील झाले होते, तर काही महाराजा रणजितसिंगाच्या सैन्यात होते. त्याचे वडील व काका हे करतार सिंग साराभा व हर दयाल ह्यांच्या गदर पार्टीचे सदस्य होते.

त्यांच्या वयाच्या इतर शीख मुलांसारखे ते लाहोरच्या खालसा हायस्कूल येथे गेले नाहीत. त्यांच्या आजोबांना त्या शाळेतील लोकांची ब्रिटिश सरकारप्रती असलेली निष्ठा मंजूर नव्हती. बारा वर्षे वय असताना जालियनवाला बाग हत्याकांडाच्या नंतर भगतसिंगाने ती जागा पाहिली. १४ वर्षे वय असतांना गुरुद्वारात नानकाना साहेब येथे अनेक लोकांना ठार मारण्याविरुद्धच्या आंदोलनात ते सामील झाले. गांधीजींनी असहकार चळवळ बंद केल्यानंतर भगतसिंगांचा अहिंसेच्या मार्गाबद्दल भ्रमनिरास झाला. त्यानंतर भगतसिंग युवा क्रांतिकारी चळवळीमध्ये सामील झाले, व ब्रिटिश सरकारचा हिंसक मागाने पाडाव करण्यासाठीच्या विचारांचे समर्थक झाले.

इटालीच्या जोसेफ मॅझिनीच्या 'यंग इटाली' नावाच्या गटापासून प्रेरित होऊन भगतसिंगाने मार्च १९२६ मध्ये 'नवजवान भारत सभा' स्थापन केली. ते हिंदुस्तान सोशालिस्ट रिपब्लिकन संघाचे सदस्य झाले. या संघटनेत चंद्रशेखर आझाद, रामप्रसाद बिस्मिल, शहिद अशफाखल्ला खान सारखे दिग्गज होते. नंतर एक वर्षाने विवाह टाळण्यासाठी भगतसिंग घर सोडून कानपूरला निघून गेला.

एका पत्रात त्याने लिहिले आहे की, 'माझे जीवन मी हे सर्वोत्कृष्ट कामासाठी समर्पित केले आहे. देशाचे स्वातंत्र्य हे माझे ध्येय आहे. त्यामुळे, कोणताच आराम किंवा कोणतेच भौतिक सुख माझे आमिष असू शकत नाही'.



भगतसिंगांचा वाचनव्यासंग दांडगा होता. क्रांतिसाहित्याने त्यांना जणू झपाटून टाकले होते. सचिंद्रनाथ संन्याल यांचे 'बंदी जीवन' हे त्यांना प्रभावित करणारे बहुधा पहिले पुस्तक असावे. ऑस्कर वाईल्डचे 'व्हेरा-दि निहिलिस्ट', क्रोपोटकिनचे 'मेमॉयर्स', मॅझिनी व गॅरिबाल्डी यांची चरित्रे, वॉल्टेर, रूसो व बकुनिनचे अनेक ग्रंथ त्यांनी वाचले होते. त्यांनी वाचलेल्या पुस्तकांची यादी फार मोठी होती.

पत्रकार म्हणून त्यांनी 'वीर अर्जुन', 'प्रताप', इत्यादी दैनिकांत काम केले होते. पत्रकारिता करतानाच त्यांच्यातला लेखक जागा झाला. सोहनसिंग जोशी यांचे 'कीर्ती', कानपूरचे 'प्रभा', दिल्लीचे 'महारथी'नी अलाहाबादचे 'चाँद' या नियतकालिकात ते लेखन करत असत. त्यांनी आयरिश क्रांतिकारक डॉन ब्रिन याच्या पुस्तकाचा अनुवाद 'मेरा आयरिश स्वतंत्रता संग्राम' हा बलवंतसिंग या नावाने केला.

**स्वातंत्र्यसंग्रामातील क्रांतिकार्य**

९ सप्टेंबर १९२५ रोजी भगतसिंगांच्या पुढाकाराने व आग्रहाने क्रांतिकारकांच्या गुप्त संघटनेचे नाव 'हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन' असे ठेवण्यात आले. असोसिएशन हा भाग समाजप्रबोधन, माहितीपत्रके, साहित्य सामग्रीची जमवाजमव, भूमिगतांना आश्रय देणे यासाठी तर 'आर्मी' हा भाग प्रत्यक्ष क्रांतिकायार्साठी असे विभाजन केले गेले. हुतात्मा चंद्रशेखर आझाद हे मुख्य समन्वयक व सेनेचे 'मुख्य सेनापती' तर भगतसिंग यांच्यावर संघटनेचे समन्वयक व दोहोंचे सदस्य व नियंत्रक अशी कामगिरी सोपविली गेली.

**भगतसिंगांचे विचार**

बालपण आजोबांच्या आर्यसमाजी संस्कारात घालवलेले व शालेय जीवनात रोज नित्य नेमाने सकाळ व सायंकाळ प्रार्थना करणारे व गायत्री मंत्रांचा जप करणारे भगतसिंग पुढे क्रांतिपर्वात पूर्णपणे निरीश्वरवादी झाले. यामुळे त्यांना 'आत्मप्रौढी व घमेंड यांची बाधा झाली आहे असेही उठवले गेले. मात्र ऑक्टोबर १९३० मध्ये त्यांनी लिहिलेले "मी निरीश्वरवादी का?" हे प्रकटन वाचल्यावर त्यांच्या महान व्यक्तिमत्त्वाची ओळख पटते.

समाज हा प्रगत असावा; प्रत्येक घटना, समज वा परंपरा या विचाराच्या ऐरणीवर घासून त्या पटल्या तरच स्वीकाराव्या, उगाच अंधश्रद्धेपोटी वा कुणाच्या व्यक्तिपूजेखातर कसोटीवर न उतरवता कोणतीही गोष्ट स्वीकारू नये, समाज हा समभावी व शोषणमुक्त असावा, समाजरचनेत व देशाच्या रचनेत धर्म, जात हे आड येऊ नयेत, उगाच कुणाचे स्तोम माजवून जनतेने आपल्या बुद्धीचा कस न लावता दबावामुळे पटत नसले तरी कुणीतरी मोठे सांगत आहे म्हणून जे वास्तविक नाही वा ज्याला तात्त्विक पाया नाही असे काही स्वीकारू नये.

समाजाची सर्वांगीण प्रगती व्हावी, पाप-पुण्य, स्वर्ग-नरक, जन्म-पुनर्जन्म, ८४ लक्ष फेरे व त्यातून मुक्ती, मृत्यूनंतरचे जीवन, वगरे तर्कशुद्ध नसलेल्या गोष्टींवर अंधविश्वास न ठेवणारा कणखर समाज निर्माण व्हावा यासाठीच त्यांचा हा प्रयत्न होता. कामगार हा राज्याचा मुख्य घटक असावा, त्याचे भांडवलदारांकडून शोषण होऊ नये व राज्यकारभारात त्याला स्थान असावे असे भगतसिंगांचे आग्रही प्रतिपादन होते.

अत्यंत प्रतिकूल व कष्टसाध्य असे जीवन समोर असताना ज्याचा मृत्यूनंतर स्वर्गप्राप्तीवर वा या जन्मात सत्कार्य केले असता मोक्ष मिळतो वा या जन्मात केलेल्या कृत्याचे फळ म्हणून पुढील जन्म अत्यंत सुखाचा जातो या गोष्टींवर विश्वास आहे त्याला समोर असलेला मृत्यू पुढील प्राप्तीच्या ओढीने सुसह्य वाटू शकतो. मात्र ज्याचा या गोष्टींवर जराही विश्वास नाही परंतु जो मातृभूमीला परदास्यातून मुक्त करणे व समाजाला शोषणातून मुक्त करून मानाचे जीवन प्राप्त करून देणे हेच आपल्या आयुष्याचे प्रथम व अखेरचे ध्येय समजतो. त्याचे जीवन हे अधिक खडतर परंतु अर्थपूर्ण असते असा त्यांचा सिद्धान्त होता. जगात जर सर्वांत भयानक पाप असेल तर ते गरिबी व सर्वांत मोठा शाप कोणता असेल तर तो दास्य हाच आहे. आणि या दास्याला ईश्वरी कोप मानून त्या दास्यातून मुक्त होण्यासाठी बलिदानाला सज्ज होण्याऐवजी ईश्वराची करुणा भाकणे हे मूर्खपणा व पळपुटेपणाचे लक्षण आहे;

हुतात्मा भगतसिंग यांच्या चरित्राचा अभ्यास केला असता आपल्याला समजते की त्यांनी केलेले बलिदान हे भावनेच्या आहारी जाऊन वा कसल्यातरी प्राप्तीसाठी केले नसून ते अत्यंत सुनियोजित, अत्यंत ध्येयबद्ध व प्रेरणादायक होते. आपण राहणार नाही, पण आपण लावलेल्या क्रांतिवृक्षाच्या सर्व फांद्या भले शत्रूने छाटून टाकल्या तरी पाळेमुळे घट्ट रुजून राहतील व हीच मुळे एक दिवस बंदिवासाच्या भिंती उन्मळून टाकतील हा त्यांचा दृढ विश्वास होता.

त्यांना आदरांजली वाहताना कुसुमाग्रजांच्या खालील ओळी सार्थ वाटतात: भगत सिंग यांचे विचार खूप मोलाचे होते ते म्हणत जिंदगी तो अपने दम पार जी जाती ही, दुसरों के कंधोंपर तो सिर्फ जनाजे उठाये जाते हैं.

*'जरी न गातील भाट डफावर तुझे यशोगान,*
*सफल जाहले तुझेच हे रे, तुझेच बलिदान'*

भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांना जी फाशी झाली ती कायदेमंडळात बॉब फेकला म्हणून नाही, तर सौंडर्सच्या हत्येच्या आरोपाखाली त्यांना फाशी देण्यात आली. २३ मार्च, १९३१ रोजी भगतसिंह, सुखदेव आणि राजगुरू यांना फासावर लटकविण्यात आले.

■ ■ ■

# खबरदार... डोळे दाखवणार असाल तर!

१७ मार्च रोजी नागपूरमध्ये झालेल्या हिंसाचारानंतर महाराष्ट्रात नेत्यांची वक्तव्ये सुरूच आहेत. दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुस्लिम समुदायाला सुरक्षेचे आश्वासन दिले आहे.

अजित पवार म्हणाले की, जो कोणी मुस्लिम बांधवांना आव्हान देईल, तो दोन गटांमध्ये संघर्ष निर्माण करून कायदा आणि सुव्यवस्था बिघडेल आणि कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करेल. तो कोणीही असो, त्याला कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही किंवा माफ केले जाणार नाही.

मुंबईतील इस्लाम जिम खाना येथे पक्षाने आयोजित केलेल्या इफ्तार पार्टीत अजित पवार यांनी हे विधान केले. अजित पवार पुढे म्हणाले की, रमजान हा फक्त एका धमार्पुरता मर्यादित नाही. तो आपल्याला एकता आणि बंधुत्वाचा संदेश देतो. भारत विविधतेत एकतेचे प्रतीक आहे.



> तुमचा भाऊ अजित पवार तुमच्यासोबत आहे. जो कोणी मुस्लिम बांधवांना डोळे दाखवेल त्याला सोडले जाणार नाही. मग तो कोणीही असो.
>
> **अजित पवार**
> महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री

छत्रपती शिवाजी महाराज, बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले आणि शाहू महाराज यांनी जातींना एकत्र आणून समाजाच्या उन्नतीचा मार्ग दाखवला. आपल्याला हा वारसा पुढे चालवायचा आहे.

दुसरीकडे, मीडिया रिपोर्ट्समध्ये असा दावा करण्यात आला आहे की महाराष्ट्र सरकारने नागपूर हिंसाचाराचा तपास गुन्हे शाखेकडे सोपवला आहे.

पोलिसांनी दोन पोलिस ठाण्यांमधून संचारबंदी उठवली आहे. वृत्तानुसार, नंदनवन आणि कपिलनगर पोलिस स्टेशन परिसरातील संचार बंदी उठवण्यात आली आहे. याशिवाय इतर पोलिस स्टेशन परिसरात दुपारी २ ते ४ वाजेपर्यंत कर्फ्यू शिथिल करण्यात आला आहे. उर्वरित नऊ पोलिस स्टेशन परिसरात आज सहाव्या दिवशीही संचारबंदी कायम ठेवण्यात आली आहे.

१७ मार्च रोजी नागपूरमध्ये झालेल्या हिंसाचारातील मुख्य आरोपी फहीम खानने सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला आहे. फहीमने असा दावा केला आहे की, विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांवर कारवाईची मागणी केल्यामुळे त्याला राजकीय सूडबुद्धीतून अटक करण्यात आली.

औरंगजेबाची कबर हटवण्यावरून झालेल्या हिंसाचार प्रकरणी मास्टरमाइंड फहीमसह ६ आरोपींविरुद्ध देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फहीमवर ५०० हून अधिक दंगलखोरांना जमवण्याचा आणि हिंसाचार भडकवण्याचा आरोप आहे.

दंगल आणि जाळपोळीच्या घटनांनंतर दोन दिवसांनी १९ मार्च रोजी अल्पसंख्याक डेमोक्रॅटिक पक्षाचे शहराध्यक्ष खान यांना अटक करण्यात आली. शुक्रवारी पोलिस कोठडी संपल्यानंतर फहीमला न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले.

दरम्यान, दादांनी आता मुस्लीमांचा पक्ष घेतल्याने विहिंप, बजरंग दल सारख्या संघटनांची बाजू घेणाऱ्या भाजपासारख्या पक्षाची गोची झाली आहे.

■ ■

## या मसाल्यांचे पाणी पिताच मिळतील आश्चर्यकारक फायदे

आपल्या भारतीय घराघरांमध्ये मसालेदार जेवण खुप आवडीने सेवन करत असतात. प्रत्येक शहरात, गावात, राज्यात तुम्हाला एक अनोखी चव आणि पांरपारिक पदार्थ पाहायला मिळेल. कारण या सर्वांमध्ये जर काही सौम्य असेल तर ते मसाले आहेत.

काळी मिरीपासून ते लवंग तसेच प्रत्येक मसल्यात स्वतःचे औषधी गुणधर्म असतात. वजन कमी करण्यासाठी चयापचय वाढवणे महत्वाचे आहे. त्यामुळे काही मसाल्यांचे पाणी तुमच्या अनेक समस्या दूर करू शकतात. .



**जिरे पाणी प्या :** जर तुमचे वाढते वजन कमी करायचे असल्यास सकाळी उठल्यानंतर जि ऱ्याचे पाणी पिणे तुमच्यासाठी फायद्याचे ठरेल. ग्लॅमरस आणि फिट राहण्यासाठी सुद्धा तुम्ही जिरे पाणीचे सेवन करू शकता. यासाठी तुम्ही अर्धा चमचा जिरे रात्रभर पाण्यात भिजत ठेवा आणि सकाळी उठल्यानंतर ते उकळवा, गाळून घ्या आणि कोमट प्या.

**मेथीच्या दाण्यांचे पाणी :** सकाळी उठल्यानंतर मेथीच्या दाण्यांचे पाणी पिणे वजन कमी करण्यास देखील मदत करते आणि मेथीच्या दाण्यांचे पाणी प्यायल्याने रक्तातील साखर नियंत्रित राहते आणि त्वचा देखील चमकदार होते.

**दालचिनीचे पाणी :** वजन नियंत्रित करण्यासाठी तुम्ही दालचिनी चहा दररोज सकाळी रिकाम्या पोटी पिऊ शकता. दालचिनी पाण्यात चांगले उकळा आणि घोट घोट करून प्या.

**बडीशेप पाणी :** उन्हाळ्यात वजन नियंत्रित करण्यासाठी बडीशेपचे पाणी प्यावे. हे तुमचे पचन निरोगी ठेवण्यास देखील मदत करते. ज्यांना बद्धकोष्ठता, आम्लपित्त किंवा सकाळी आजारपणाची समस्या आहे त्यांच्यासाठीही बडीशेप पाणी फायदेशीर आहे. ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### अतुट नाते मैत्रीचे..!

शुभप्रभाती चहा सोबत
वर्तमानपत्र हाती येते
सुटी असली पेपरला
तर भौ करमेनासे होते..!

व्हाटसअप पेक्षा पेपरच्या
बातम्यांची असते खात्री
म्हणून जिल्हावार्ता पत्र
नजरेखालून काढतो आधी..!

बाजारभाव हवामान अंदाज
वाचून लागतो कामाला
शब्दकोडे,आज कुठे काय?
आदी चालना देती ज्ञानाला..!

वैश्विक घडामोडीचा आढावा
व्यावहारीक ज्ञानात घालते भर
विज्ञान ,महिला जगत,अद्यात्माने
वैचारीक प्रगलभतेचा
वाढतो स्तर..!

# सेन्सोडाईन ने स्थापन केला गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड २०२५ वर्ल्ड ओरल हेल्थ डे अभियान सुरू करणार

**अमरावती, २२ मार्च :** हेलेऑन (पूर्वीची ग्लॅक्सोस्मिथक्लाईन कन्झ्युमर हेल्थकेअर) यांचा आघाडीचा मौखिक देखभाल ब्रँड असलेल्या सेन्सोडाईनने २४ तासांत सर्वाधिक ऑनलाइन डेन्टल स्क्रीनिंग टेस्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न करून यशस्वीरित्या एक गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड स्थापन केला आहे. हा विक्रमी उपक्रम महा कुंभ २०२५ येथे राबविण्यात आला. या उपक्रमात २७,००० पेक्षा जास्त लोकांनी दातांची तपासणी करवून घेतली. भारतीयांना सक्रिय मौखिक देखभालीचे महत्त्व समजावून देण्याच्या बाबतीतील हे एक लक्षणीय पाऊल ठरले. या व्यतिरिक्त, आपल्या निष्ठेला अनुसरून सेन्सोडाईनने आपल्या अलीकडेच लॉन्च झालेल्या २० रु. च्या छोट्या टुथपेस्ट पॅक्सचे वितरण केले. दातांच्या संवेदनशीलतेपासून संरक्षण मिळवणे अधिक किफायतशीर आणि सहजप्राप्य बनवण्यासाठी खास तयार केलेले हे पॅक आहेत.

या विक्रमापासून सेन्सोडाईनच्या वर्ल्ड ओरल हेल्थ डे अभियानाची सुरुवात देखील झाली आहे. या अभियानाचा उद्देश लोकांना अधिक चांगल्या मौखिक आरोग्याच्या दिशेने पहिले पाऊल उचलण्यासाठी प्रोत्साहित करण्याचा आहे. एक दशकापेक्षा अधिक काळापासून सेन्सोडाईनने लोकांना दातांमधील संवेदनशीलता प्रारंभिक टप्प्यात ओळखून त्यावर उपाययोजना करण्यासाठी सक्षम बनवले आहे आणि देशभरात चिल टेस्ट्स आयोजित केल्या आहेत. या उपक्रमामुळे लक्षावधी लोकांना त्यांच्या दातांच्या आरोग्याची स्थिती ओळखण्यास, वेळेवर डॉक्टरी सल्ला घेण्यास तसेच आपल्या आवडत्या खाद्य पदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी सुदृढ होण्यात व आपले एकंदरित जीवनमान सुधारण्यात मदत झाली आहे.

किश्ले सेठ, कॅटेगरी लीड ओरल हेल्थ, हेलेऑन इंडिया सबकॉन्टिनेन्ट म्हणाले, सेन्सोडाईन मध्ये आमचे मिशन हेच आहे की लोकांना त्यांच्या मौखिक आरोग्याच्या दिशेने पहिले पाऊल उचलण्यासाठी प्रवृत्त करणे. महा कुंभ २०२५ मध्ये एक गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड स्थापन करताना केवळ संख्येचे महत्त्व नाही, तर हजारो लोकांपर्यंत पोहोचून, त्यांची जागरूकता वाढवून दररोज त्यांना अधिक चांगल्या मौखिक आरोग्यासाठी प्रोत्साहित करता आले हे आमच्यासाठी महत्त्वाचे आहे. हाच उपक्रम आम्ही वर्ल्ड ओरल हेल्थ महिन्या(महिने) दरम्यान पुढे नेत आहोत आणि लोकांना मोफत डिजिटल दात तपासणीची सुविधा देऊ करत आहोत. या सध्याच्या प्रयत्नांमार्फत सेन्सोडाईन भारतात मौखिक आरोग्याचे प्रमाण सुधारण्याचे काम चालू ठेवत आहे आणि मौखिक आरोग्याबाबतचे शिक्षण, जागरूकता आणि उपचार सर्वांसाठी अधिक सहज-प्राप्य बनवत आहे.

डॉ. अशोक ढोबळे, सेक्रेटरी जनरल हेड, इंडियन डेन्टल असोसिएशन म्हणाले, भारतात मौखिक आरोग्याविषयीची जागरूकता वाढविण्याच्या या उपक्रमात सेन्सोडाईनशी भागीदारी करताना आम्हाला अभिमान वाटत आहे. इंडियन डेन्टल असोसिएशन या नात्याने आम्ही प्रतिबंधात्मक डेन्टल केअरचा प्रचार करण्यात नेहमीच आघाडीवर असतो. आणि हा उपक्रम म्हणजे एक उदाहरण आहे, ज्यामधून मौखिक आरोग्य सुधारण्यात शिक्षण आणि सुलभतेची ताकद दिसते. या प्रयत्नांमुळे अधिक चांगल्या मौखिक आरोग्यासाठी पहिले पाऊल उचलण्यासाठी लोक उद्युक्त तर झालेच शिवाय, लवकर निदान होऊन त्यावर उपाययोजना करण्याचे महत्त्व देखील अधोरेखित झाले.

# मेडिसेवा आणि एसएमएचआरसी यांच्या संयुक्त विद्यमाने कळमेश्वर येथे व्यापक आरोग्य तपासणी शिबिराद्वारे आरोग्य जागरूकता अभियानाचे आयोजन

**कळमेश्वर, (नागपूर), २२ मार्च :** मेडिसेवाने स्कूल ऑफ मेडिकल अँड हेल्थ रिसर्च सेंटर (एसएमएचआरसी) यांच्या सहयोगाने ब्राह्मणी कळमेश्वर येथील स्मृती विद्यालयात सर्वसमावेशक शालेय आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. ग्रामीण व शहरी लोकांच्या आरोग्यविषयक गरजा हाताळण्याच्या उद्दिष्टाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आजाराचे लवकर निदान करणे, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा व आरोग्यशिक्षण यावर या शिबिरात भर देण्यात आला होता.

या दोन दिवसीय शिबिरात १०,००० व्यक्तींनी आरोग्य तपासणी करून घेतली. वंचित समुदायांमधील व्यक्तींना असलेल्या आजाराचे लवकर निदान करणे, आरोग्यशिक्षण आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेचे

महत्त्व यावर या शिबिरात भर देण्यात आला होता. कळमेश्वरमधील ग्रामीण लोकसंख्या ८५,४५७ आहे तर शहरी लोकसंख्या ३६,९०६ आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून मेडिसेवाच्या प्रयत्नांचा या लोकसंख्येला थेट लाभ झाला.

या शिबिराचा शहरी आणि ग्रामीण दोन्ही भागातील नागरिकांवर मोठा प्रभाव पडला. या उपक्रमात वैद्यकीय

तज्ज्ञांची बहुविशेषज्ञ टीम सहभागी झाली होती. यामध्ये डॉ. ऋषभ (वैद्यकीय), डॉ. ऋतुजा




(सामुदायिक वैद्यक), डॉ. संभवी (दंतचिकित्सा), डॉ. हीना (बालरोगतज्ज्ञ), सुदीपांश (नेत्ररोग), निराली (नेत्ररोग विद्यार्थी), दोन परिचारिका विद्यार्थी आणि मेडिसेवा फील्ड एक्झिक्युटिव्ह यांचा समावेश होता. या तज्ज्ञांनी सामान्य आरोग्य तपासणी, दंतचिकित्सा, बालरोग तपासणी, नेत्रतपासणी तसेच आरोग्यविषयक जागरूकता सत्रे घेतली आणि आवश्यक वैद्यकीय सेवा पुरवल्या. या उपक्रमाचे महत्त्व स्पष्ट करताना मेडिसेवाचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विशेष कासलीवाल म्हणाले, हे आरोग्य तपासणी शिबिर ग्रामीण आणि शहरी भागातील आरोग्य सेवांमधील दरी भरून काढण्याच्या आमच्या प्रयत्नांचे प्रतीक आहे. आवश्यक आरोग्य सेवा उपलब्ध करून देत आम्ही समुदायासाठी निरोगी भविष्यासाठी कार्य करत आहोत. ते पुढे म्हणाले, अशा संयुक्त प्रयत्नांमुळे आरोग्यसेवा उपलब्धतेतील असमानता दूर होण्यास मदत होते. आरोग्यशिक्षण आणि लवकर निदान या माध्यमातून आम्ही लोकांना त्यांच्या आरोग्याची जबाबदारी घेण्यासाठी सक्षम करतो.

डॉ. कासलीवाल यांनी भविष्यातील योजनांबाबत सांगितले की, आणखी वैद्यकीय महाविद्यालये आणि प्रमुख रुग्णालयांसोबत भागीदारी वाढवण्याचा आमचा उद्देश आहे.

डॉ. विशेष कासलीवाल आणि रचित कासलीवाल यांनी स्थापन केलेली मेडिसेवा हायब्रिड आरोग्यसेवेत अग्रेसर असून, टेलिमेडिसिन आणि प्रत्यक्ष वैद्यकीय सेवा यांचा समन्वय साधून आरोग्यसेवा अधिक व्यापक आणि सुलभ करत आहे. स्मृती विद्यालयात आयोजित करण्यात आलेले शालेय स्तरावरील आरोग्य तपासणी शिबीर हे मेडिसेवाच्या आरोग्यसेवा सुधारण्याच्या उद्दिष्टातील आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले. अत्याधुनिक तंत्रज्ञान, विशेष वैद्यकीय तज्ज्ञता आणि समुदायाची सक्रिय भागीदारी यांची सांगड घालून मेडिसेवा आणि एसएमएचआरसी यांनी भारताच्या निरोगी भविष्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. अधिक माहितीसाठी: www.medyseva.com या वेबसाइटला भेट द्या.

# अभिनेत्रींनी उन्हाळ्यामधील त्यांच्या स्किनकेअर सिक्रेट्सबाबत सांगितले!



**मुंबई, २२ मार्च :** उन्हाळा आला आहे आणि कडक ऊन, आर्द्रता व प्रखर सूर्यप्रकाशापासून संरक्षणासाठी आपल्या वॉर्डरोबप्रमाणे स्किनकेअर नित्यक्रमामध्ये देखील बदल करणे गरजेचे आहे. संपूर्ण ऋतूदरम्यान त्वचा कोमल, आरोग्यदायी व चमकदार ठेवण्यासाठी एण्ड टीव्हीवरील अभिनेत्री त्यांच्या समर स्किनकेअर सिक्रेट्सबाबत सांगत आहेत. या अभिनेत्री आहेत स्मिता साबळे (धनिया, 'भीमा'), गीतांजली मिश्रा (राजेश, 'हप्पू की उलटन पलटन') आणि शुभांगी अत्रे (अंगूरी भाबी, 'भाबीजी घर पर है'). मालिका 'भीमा'मधील स्मिता साबळे ऊर्फ धनिया म्हणाल्या, ''उन्हाळ्यामधील कडक ऊन घातक ठरू शकते, म्हणून मी स्किनकेअर नित्यक्रमामध्ये त्वचेचे संरक्षण आणि हायड्रेशनवर लक्ष केंद्रित करते. मी वजनाने हलक्या फोमिंग क्लीन्सरचा वापर करते, ज्यानंतर त्वचेच्या छिद्रांमध्ये असलेली धूळ काढून टाकण्यासाठी अल्कोहोल-मुक्त टोनरचा वापर करते. उन्हाळ्यादरम्यान मी सनस्क्रिनचा वापर करते. मी दर काही तासांनी, विशेषत: बाहेर शूटिंग करत असताना सनस्क्रिनचा वापर करते. त्वचेला कूल व टवटवीत ठेवण्यासाठी मी रात्रीच्या वेळी ॲलो व्हेरा जेलचा वापर करते, जे उन्हाळ्यामधील जळजळीला शांत करते आणि त्वचा कोरडी होण्याला प्रतिबंध करते. मी आठवड्यातून दोनदा होममेड कूलिंग मास्कचा वापर करते, जे दही व पुदीनाच्या पानांसह बनवले जाते आणि माझ्या त्वचेला कोमल व टवटवीत ठेवते. स्किनकेअरव्यतिरिक्त मी कलिंगड व काकडी यांसारख्या हंगामी फळांचे सेवन करते, जे माझ्या त्वचेला हायड्रेटेड व चमकदार ठेवतात.''

मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मध्ये राजेशची भूमिका साकारणाऱ्या गीतांजली मिश्रा म्हणाल्या, ''मूळातच तेलकट त्वचा असल्यामुळे माझ्यासाठी उन्हाळा खूप आव्हानात्मक ठरू शकतो. यापासून संरक्षणासाठी मी साध्या व गुणकारी स्किनकेअर नित्यक्रमाचे पालन करते. मी दिवसातून दोन वेळा कडुनिंब व टी ट्री ऑइल फेस वॉशसह माझा चेहरा स्वच्छ धुते, ज्यामुळे अतिरिक्त तेलावर नियंत्रण राहते आणि मुरमं येण्यास प्रतिबंध होतो. माझी आई मला नेहमी म्हणायची की मुल्तानी माती व गुलाबजलपासून बनवलेल्या साध्या फेस पॅकचा वापर करावा, जे अतिरिक्त तेल शोषून घेते आणि त्वचेला कोमल व टवटवीत करते. वर्षानुवर्षे मी या समर स्किनकेअरचा वापर करत आहे. माझ्या नित्यक्रमामधील आणखी एक महत्त्वाचा उपाय म्हणजे मी मॅटिफाइंग जेल-आधारित मॉइश्चराइझरचा वापर करते, जे माझ्या त्वचेला तेलकट न करता हायड्रेटेड ठेवते. त्वरित कूलिंगसाठी मी मेकअप करण्यापूर्वी चेहऱ्यावर बर्फाचे तुकडे फिरवते, यामुळे मुरमं कमी होण्यास आणि घामावर नियंत्रण राहण्यास मदत होते.'' मालिका 'भाबीजी घर पर है'मधील शुभांगी अत्रे ऊर्फ अंगूरी भाबी म्हणाल्या, ''उन्हाळ्यातील उकाडा आव्हानात्मक ठरू शकतो, पण त्वचा आरोग्यदायी व टवटवीत ठेवण्यासाठी हायड्रेटेड राहणे महत्त्वाचे आहे. मी दररोज किमान तीन लीटर पाणी पिते, ज्यामुळे शरीरातील टॉक्झिन्स बाहेर पडण्यास मदत होते आणि माझी त्वचा नैसर्गिकरित्या कोमल राहते. मी ॲलो व्हेरा, काकडीचा रस आणि मधापासून बनवलेल्या होममेड समर मास्क्सचा वापर करते, जे माझ्या त्वचेला कोमल बनवतात. ॲलो व्हेरा हा माझा उन्हाळ्यातील पसंतीचा घटक आहे, जो माझ्या त्वचेला थंडावा देतो, हायड्रेटेड ठेवतो आणि सूर्यप्रकाशामुळे होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण करतो. मी उन्हाळ्यामध्ये अतिप्रमाणात मेकअप करणे टाळते आणि एसपीएफसह किमान उत्पादनांचा वापर करते. गुलाबजल व पुदीनासह बनवलेले साधे डीआयवाय कूलिंग टोनर दिवसभर माझ्या त्वचेला टवटवीत व कोमल ठेवते. माझ्यावर विश्वास ठेवा, समर स्किनकेअर म्हणजे हायड्रेशन व सूर्यप्रकाशापासून संरक्षण आणि हे सोपे उपाय मोठा बदल घडवू शकतात.''

# सॅमसंगचे नवीन एआय-पॉवर्ड पीसी, गॅलॅक्सी बुक५ सिरीज आता भारतात उपलब्ध

**गुरूग्राम, २२ मार्च :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज देशभरात गॅलॅक्सी बुक५ सिरीजच्या उपलब्धतेची घोषणा केली. अत्याधुनिक कार्यक्षमता आणि सर्वोत्तम एआय वैशिष्ट्ये असलेली गॅलॅक्सी बुक५ सिरीज नेक्स्ट-लेव्हल उत्पादकता, सर्जनशीलता आणि मनोरंजनासाठी डिझाइन करण्यात आली आहे.

एआय-पॉवर्ड कम्प्युटिंग अधिक सहजसाध्य करत इंटेल कोअर अल्ट्रा असलेल्या गॅलॅक्सी बुक५ सिरीजची किंमत ११४९०० रूपयांपासून सुरू होते, जी यापूर्वीच्या गॅलॅक्सी बुक४ सिरीज मॉडेल्सपेक्षा १५,००० रूपयांनी कमी आहे.

गॅलॅक्सी बुक५ सिरीज खरेदी करणाऱ्या ग्राहकांना जवळपास १०,००० रूपयांची कॅशबॅक आणि फक्त ७,९९९ रूपयांमध्ये (मूळ किंमत १९,९९९ रूपये) गॅलॅक्सी बड्स३ प्रो मिळू शकते. डिवाईसेस जवळपास ४ महिन्यांच्या नो कॉस्ट ईएमआय पर्यायासह देखील उपलब्ध आहेत. तसेच, विद्यार्थी विशेष १० टक्के सूटचा लाभ घेऊ शकतात, ज्यामुळे गॅलॅक्सी बुक५ सिरीज तरूण व्यावसायिक व विद्यार्थ्यांसाठी अनुकूल



पर्याय आहे.

मायक्रोसॉफ्ट इंडियाच्या डिवाईस पार्टनर सेल्सचे कंट्री हेड नमित सिन्हा म्हणाले, ''मायक्रोसॉफ्टमध्ये आम्ही वापरकर्त्यांना एआय-संचालित इनोव्हेशन्ससह सक्षम करण्याप्रती कटिबद्ध आहोत, जे उत्पादकता व सर्जनशीलता वाढवतात. मायक्रोसॉफ्टचे कॉपीलॉट+ पीसी अनुभव व इंटेलच्या इंटेल कोअर अल्ट्रा प्रोसेसर्सची शक्ती असलेली गॅलॅक्सी बुक५ सिरीज भारतातील ग्राहकांना इंटेलिजण्ट कम्प्युटिंग, ऑप्टिमाइज वर्कफ्लो आणि उत्तम कार्यक्षमता देते. सॅमसंगसोबतचा आमचा सहयोग खात्री देतो की, हे एआय-पॉवर्ड डिवाईसेस अपवादात्मक कार्यक्षमता, सुरक्षितता आणि सर्वोत्तम कम्प्युटिंग अनुभव देतात, ज्यामुळे वापरकर्ते सहजपणे एआयसह अधिक यशस्वी होण्यास सक्षम होतात.''

इंटेल इंडियाच्या पीसी क्लायण्ट कॅटेगरीचे संचालक अक्षय कामत म्हणाले, ''आम्हाला सॅमसंग गॅलॅक्सी बुक५ सिरीजच्या लाँचबाबत खूप आनंद होत आहे. या नवीन मशिन्सची खासियत म्हणजे आमचे नवीन इंटेल कोअर अल्ट्रा सिरीज प्रोसेसर्स, जे एआय पीसींच्या नेक्स्ट जनरेशनला शक्ती देतात, ज्यामधून अपवादात्मक सीपीयू कोअर कार्यक्षमता, ग्राफिक्समध्ये मोठी झेप आणि अविश्वसनीय एआय अनुभव मिळतो. तळागाळापासून या प्रोसेसर्सना नवीन रूप देत आम्ही मोठ्या प्रमाणात एआय कार्यक्षमता सुधारली आहे, तसेच अविश्वसनीय बॅटरी लाइफ देखील दिली आहे. याव्यतिरिक्त, वापरकर्त्यांना खात्री मिळते की त्यांचे ॲप्लीकेशन्स विनासायासपणे काम करतील, ज्याचे श्रेय एक्स८६ इकोसिस्टमने दिलेल्या कॉम्पॅटिबिलिटीला जाते.''

# आयसीआयसीआय प्रु गिफ्ट सिलेक्टसह संपत्तीचे संरक्षण आणि महागाई नियंत्रित अगदी सोपे

**अमरावती, २२ मार्च :** आजच्या अनिश्चित आर्थिक परिस्थितीत वाढती महागाई हाताळण्यासाठी, बाजारातील चढ-उतारांवर मात करण्यासाठी आणि आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अतिरिक्त उत्पन्नाचा स्रोत असणे गरजेचे झाले आहे. या गरजेची पूर्तता करण्यासाठी, लोक अशा गुंतवणुकीच्या पर्यायांकडे पाहत आहेत जे गुंतवलेल्या भांडवलाची सुरक्षितता आणि वाढ दोन्ही प्रदान करतील. ही गरज पूर्ण करण्यासाठी, आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्स ने आयसीआयसीआय प्रु गिफ्ट सिलेक्ट नावाचा एक खास दीर्घकालीन बचत योजना सुरु केली आहे. हा प्लॅन तुमच्या संपत्तीचे जतन करत निश्चित उत्पन्न मिळवून देण्यासाठी बनविण्यात आला आहे. आमचे उद्दिष्ट ग्राहकांना त्यांची दीर्घकालीन आर्थिक स्वप्ने निश्चितपणे पूर्ण करण्यात मदत करणे आहे, असे आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्सचे मुख्य उत्पादन आणि वितरण अधिकारी श्री. अमित पालटा यांनी सांगितले. या योजनेत लवचिकता असून ग्राहकांना निश्चित उत्पन्न कालावधी निवडण्याचा पर्याय मिळतो याशिवाय मॅच्युरिटीच्या वेळी एकरकमी मोठी रकम मिळते आणि ती कर भरण्याच्या दृष्टीने फायदेशीर असते. या योजनेमध्ये दरवर्षी ५% उत्पन्न वाढते ज्यामुळे ग्राहकांना वाढत्या महागाईला तोंड देणे सोपे होते.

# एसबीआय, दक्षिण पूर्व मध्य रेल्वे (नागपूर विभाग) पगार खात्यांसाठी सामंजस्य करार



**नागपूर, २२ मार्च :** भारतातील सर्वात मोठी बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया, प्रशासकीय कार्यालय, नागपूर आणि दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर विभाग यांनी शुक्रवारी वेतन खात्यांसाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. एसबीआयच्या रेल्वे सॅलरी पॅकेजचे आकर्षक फायदे MOU मध्ये तपशीलवार वर्णन केले आहेत. यामध्ये १ कोटींचा वैयक्तिक अपघात विमा, १.६० कोटीचा हवाई अपघात विमा, सवलतीचे गृहकर्ज, कार कर्ज आणि रुपे डेबिट कार्ड इत्यादी विविध जीवनशैली लाभांचा समावेश आहे.

या सामंजस्य करारावर एसबीआय चे उपमहाव्यवस्थापक राजीव सावराव आणि दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या वतीने उदय कुमार भारती, वरिष्ठ डीपीओ, नागपूर विभाग यांनी स्वाक्षरी केली. एसबीआयच्या वतीने प्रादेशिक व्यवस्थापक, नागपूर पूर्व सत्येंद्र सुधांशू, सहायक महाव्यवस्थापक अमितेश रुपक आणि जयता दयाल, शाखा व्यवस्थापक पीबीबी किंग्सवे रोड श्रीधर जेना उपस्थित होते.

यावेळी एसईसीआरचे डीआरएम दीपक कुमार गुप्ता, बी. श्रीधर, वरिष्ठ विभागीय वित्त व्यवस्थापक श्वेता एच. के. छोरिया, डीपीओ उपस्थित होते.

# चित्रकलेतील प्रतिभावान विद्यार्थ्यांना पुरस्कार प्राप्त

**गोंडखैरी, २२ मार्च :** विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे समाजाचे आद्यकर्तव्य आहे. याच कर्तव्याचा भाग म्हणून गोंडखैरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत अदानी फाऊंडेशनच्या वतीने आयोजित चित्रकला स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

याअनुषंगाने पहिला पुरस्कार निधी शाहु, दुसरा क्रमांक सृष्टी पंचभावे आणि तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक अभिमन्यू वाघ यांना प्रदान करण्यात आले. यावेळी झालेल्या सन्मान सोहळ्यात मुख्याध्यापिका प्रतिभा पाधले, वर्षा डोंगरवार, अंगणवाडी सेविका सुनीता कथाने, सागर पवार, हिमांशू तागडे, अदानी फाऊंडेशनचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. ग्रामीण भागातील मुलांनाही दर्जेदार शिक्षण मिळायला हवे. तेव्हाच त्यांचाही जीवनस्तर उंचावेल अन ते राष्ट्रीय प्रवाहात येतील. अगदी हीच




उदात्त भूमिका स्वीकारून सामाजिक दायित्व पूर्ण करीत अदानी फाऊंडेशनने चित्रकला स्पर्धेचे फेब्रुवारी महिन्यात आयोजन केले होते. यात सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून पारितोषिक देण्यात आले. तर सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा विशेष सन्मान केला गेला. चित्रकलेतून मुलांना मनातील गोष्टी कागदावर रेखाटता येतात. नव्हे भावना प्रकट करण्याचे अर्थात भावविश्व उलगडण्याचा चित्रकला हे सर्वोत्तम माध्यम असल्याचेही यावेळी उपस्थितांनी स्पष्ट केले.

# जरा याद करो कुर्बानी...




दीडशे ते दोनशे वर्ष इंग्रजांच्या पारतंत्र्यात असणाऱ्या भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी हजारो स्वातंत्र्य सैनिकांनी स्वतःच्या जीवाचे बलिदान दिले. अनेक जण फासावर चढले तर कित्येकांनी इंग्रजांच्या गोळ्या छातीवर झेलल्या. या वीर स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानाने १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत माता इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त झाली. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी छातीवर गोळ्या झेलल्या तर अनेक स्वातंत्र्य सैनिक हसत हसत फासावर चढले. भगत सिंग, राजगुरू आणि सुखदेव हे स्वातंत्र्य सैनिक देखील भारत मातेला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी हसत हसत फासावर चढले आणि शहीद झाले. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या जीवाची बाजी लावणारे स्वातंत्र्य सैनिक शहीद भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोजी इंग्रजांनी फाशी दिली होती. आज २३ मार्च हा दिवस शहीदांच्या नावे कोरला गेला गेला आहे. आजच्याच दिवशी म्हणजे २३ मार्च १९३१ रोजी शहीद भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःच्या प्राणाचे बलिदान दिले. ९४ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी इंग्रजांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी दिली होती. देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या शहिदांना आदरांजली वाहण्यासाठी आजचा दिवस संपूर्ण देशात शहीद दिवस म्हणून साजरा केला जातो. १९२८ मध्ये सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले होते. या कमिशनला विरोध म्हणून लाला लजपतराय यांनी मोठा मोर्चा काढला होता. सायमन कमिशनला विरोध करणाऱ्या लाला लजपतराय यांच्यावर इंग्रजांनी लाठीहल्ला केला. या लाठी हल्ल्यात लाला लजपतराय गंभीर जखमी झाले त्यातच त्यांचा मृत्यू झाला. लाला लजपतराय यांच्या मृत्यूनंतर संपूर्ण देशात इंग्रजांविरुद्ध संतापाची लाट उसळली. लाला लजपतराय यांच्या मृत्युनंतर देशातील जहाल गटाचे स्वातंत्र्य सैनिक कमालीचे चिडले. चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरु, सुखदेव आणि अन्य जहाल क्रांतिकारकांनी लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्याची शपथ घेतली. लाला लजपतराय यांच्या मृत्यूच्या एक महिन्याच्या आतच या क्रांतिकारकांनी आपली शपथ पूर्ण केली आणि १७ डिसेंबर १९२८ रोजी ब्रिटिश अधिकारी सँडर्सला गोळ्या घालून ठार केले. काही काळ ते भूमिगत राहिले मात्र फितुरीमुळे ते पोलिसांच्या हाती लागले. ७ ऑक्टोबर १९३० रोजी इंग्लिश कोर्टाने भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशीची शिक्षा सुनावली. यानंतर भगतसिंग यांची शिक्षा कमी व्हावी यासाठी फेर याचिका दाखल करण्यात आली मात्र १० मार्च १९३१ रोजी ती याचिका कोर्टाने फेटाळली. २३ मार्च हा दिवस भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांच्या फाशीसाठी निश्चित करण्यात आला. २३ मार्च १९३१ रोजी सकाळी ७ वाजून ३३ मिनिटांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी देण्यात आली. फाशीच्या वेळी या तिघांनी मेरा रंग दे बसंती चोला .... हे गाणे गायले. फासावर लटकतानाही भारत मातेच्या या सुपुत्रांच्या चेहऱ्यावर कसल्याही प्रकारचे दुःख किंवा पश्चाताप नव्हता उलट भारत मातेसाठी फासावर जात असल्याचा अभिमान होता. आजच्या दिवशी भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या क्रांतिकारकांच्या बलिदानाचे स्मरण करणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य ज्ञात अज्ञात शहिदांना शाहिद दिनी विनम्र अभिवादन!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# शब्दकोडे क्रमांक २०६४



**आडवे शब्द :-**


१) महादेवाचे एक नाव
३) विधवा
६) आग्रा येथील जगप्रसिद्ध वास्तू
१०) पाताळ
१२) भ्रमर
१३) मध्यस्थ
१५) पाळीपाळीने
१६) इच्छा
१८) चुलता (हिं.)
१९) ताजा ***, नव्या दमाचा
२१) अफवा
२४) सान
२६) काढलेली सुट्टी
२८) नेत्र
३०) चंद्र
३३) समुद्राच्या लाटांचा आवाज
३५) सत्वयुक्त
३७) सगळा, जमीनीवरील कर
३९) बंदी, मना
४०) पं नेहरुजींचे नाव
४२) पटल,
४३) दरवडा
४५) मंगलप्रसंगी वाजविण्याचे वाद्य
४६) मनाचा ओढा
४८) मोठा नगारा
५०) दारूचा एक प्रकार
५२) जमीन
५३) उपवासाचे तांदूळ
५४) दात
५६) लोणचे
५९) सुपारीचा तुकडा
६०) हिंदुस्थानी
६२) कपाळावरील भाग्यरेखा
६३) फोक, छडी
६५) गंध
६८) मोठी टोपली
६९) पराकाष्ठेचा लाभ
७०) सारखा
७२) लगेच, पाठोपाठ
७४) बसकर, योगाचे प्रकार
७५) भरभराट
७७) अंगाने जाड असलेली
७९) वाहणारी हवा
८०) गुंडांच्या दोन गटातील मारामारी
८१) पाठवणी
८२) सावकाराला कर्जावर द्यावयाची अधिक रक्कम

**उभे शब्द :-**

१) शनिवार
२) बाण सोडणे
३) अवस्था, स्थिती
४) पायाचा खालचा भाग
५) श्रीविष्णूचा बुटका अवतार
६) बळ, शक्ती
७) सोन्याचा धागा
८) चलनवलन
९) सत्ता
११) उंट हाकणारा
१४) जाळणे
१७) एक अधिक एक चतुर्थांश
२०) जासूद, पायदळातील नाईक
२२) कोवळा अंकुर
२३) दुर्दशा
२५) यावर्षी, यंदा
२७) जागृत, स्थान, ठिकाण
२९) धमनी
३१) प्रत्यक्ष कृती
३२) रोमांच उभे करणारे
३४) एक प्रकारची मोठी तलवार
३६) गाल, हनुवटीवरील केस
३८) आपला परका अशी भावना
४०) जन्म
४१) गर्द तांबडा रंग
४४) निमित्त, सबब
४७) कोवळे गवत
४९) एक प्राचीन पर्वत
५१) दिवटी
५५) किंमत
५७) बारीक नक्षीकाम
५८) सुंदर, शोभिवंत
६१) तीर्थयात्रा करीत फिरणे
६४) स्वस्तच्या विरुद्ध
६५) वाल्मिकी ऋषींचे पहिले नाव
६६) उत्सव
६७) प्रत्येक ठिकाणी
६९) रेशीमाचा किडा, कोळी
७१) दहावी रास
७३) सर, माळ, पानांचा भारा
७४) कुंभाराची भट्टी
७५) बांधलेला
७६) तेव्हा (ग्रा.)
७६) संध्याकाळ

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



महासागर अकोला
पान ६
●रविवार,दि.२३ मार्च २०२५

# भाव पडल्याने हरभऱ्यांची आवक घटली

**अकोला :** यंदा शासनाने हरभऱ्याचा हमीभाव हा ५,६५० एवढा जाहीर केला आहे. मात्र कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सरासरी पाच हजार रुपये दराने हरभऱ्याची खरेदी होत असल्याचे वास्तव आहे. त्यामुळे क्विंटल मागे ५०० ते ६०० रुपयांचा भुर्दंड शेतकऱ्यांना बसत आहे.केंद्रीय मंत्रिमंडळाने हरभरा हमीभाव २०२५-२६ हंगामात ५६५० रुपये करण्यात आला आहे. मात्र शासकीय हमीभाव खरेदी केंद्रांवर हरभरा नोंदणी व खरेदी अद्याप सुरू झाली नसल्याने बाजार समित्यांमध्ये सरासरी ५२०० रुपये किंटल प्रमाणे खरेदी सुरू आहे. यामुळे शेतकऱ्यांचे पाचशे ते सहाशे रुपयांचे नुकसान होत आहे. रब्बी हंगामातील मुख्य पीक असलेल्या हरभऱ्याची सध्या काढणी सुरू असून माल तयार होवून बाजार समितीत देखील दाखल झाला असून दररोज अडीच हजार क्विंटल एवढी आवक आहे. दरवर्षीप्रमाणे यंदा भावात चढ-उतार होताना दिसत आहे.

हरभरा उत्पादक शेतकऱ्यांना जिल्ह्यातील शासकीय नोंदणी खुली करून दिल्यास क्विंटल मागे होणार ५०० ते ६०० रुपये होणारे नुकसान थांबणार आहे. सरकारी हमीभाव खरेदीची नोंदणी प्रक्रिया सुरू झाल्यास शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. त्यामुळे येथील लोकप्रतिनिधीनी शेतकऱ्यांचे दुःख जाणून प्रश्न सोडवावा अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश ३४७ उमेदवार पाच वर्षांसाठी अपात्र

**▪अकोला,दि २२ (प्रतिनिधी):** ग्रामपंचायत निवडणूक लढविलेल्या मात्र विहित मुदतीत खर्चाचा हिशोब सादर न करणाऱ्या तेल्हारा, अकोला, बाशीटाकळी. पातूर तालुक्यातील ३४७ उमेदवारांना पाच वर्षांसाठी निवडणूक लढविण्यास अपात्र ठरविण्याचे आदेश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी जारी केले आहेत.जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने सात सरपंचासह १३३ ग्रामपंचायत सदस्यांना अपात्र करण्याचेआदेश देण्यात आले आहेत. २० डिसेंबर रोजी ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक निवडणुकीचा निकाल जाहीर झाला. विहित मुदतीत निवडणूक खचीचा हिशोब सादर न केल्याने चार तालुक्यातील ग्रामपंचायत



निवडणूक लढविलेल्या उमेदवारांना पुढील पाच वर्षांसाठी अपात्रतेची कारवाई करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत उमेदवाराने निवडणुकीत केलेल्या खर्चाचा हिशोब तहसील स्तरावर निवडणूक विभागाकडे सादर करणेबंधनकारक आहे. तहसीलदारयांच्या कडून प्रस्तावानुसार जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी संबंधित उमदवारांना पुढील ५ वर्षांसाठी अपात्र ठरविण्याचे आदेश काढले आहेत. सध्या ग्रामपंचायत निवडणूक लढवलेल्या ३४७ उमेदवारांवर अपात्रतेची कारवाई झाली. उर्वरित तीन तालुक्याच्या अहवाल प्राप्त झाल्यानंतर ही संख्या ५०० च्या वर जाणार आहे. या उमेदवारांना पुढचे पाच वर्ष गावची निवडणूक लढविता येणार नाही.

# रेती धोरणावर आ. रणधीर सावरकर यांची मागणी

**▪अकोला,दि २२ (प्रतिनिधी):** अकोला पुर्वचे आमदार रणधीर सावरकर यांनी रेती धोरणातील बदलांची मागणी केली होती, ती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तातडीने मंजूर केली आहे. या बदलांनुसार, रेती उत्खननाच्या परवानग्या देण्यासाठी ग्राम पातळीवरील अधिकाऱ्यांना असलेले अधिकार काढून घेण्यात आले आहेत आणि हे अधिकार आता जिल्हा पातळीवर देण्यात आले आहेत.रेती धोरणातील बदलांनुसार, ग्रामपंचायत आणि तहसील स्तरावरील अधिकाऱ्यांना असलेले रेती उत्खननाचे अधिकार काढून घेण्यात यावेत. रेती उत्खननाच्या परवानग्या आणि नियंत्रणाचे सर्व अधिकार जिल्हा स्तरावर केंद्रित करण्यात यावेत.

या बदलांमुळे रेती उत्खनन प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि कार्यक्षमता येईल, असे आमदार सावरकर यांनी सांगितले. यामुळे रेती उत्खननात होणारे गैरप्रकार टाळण्यास मदत होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

# अनोळखी युवकाचा रेल्वेतून पडून मृत्यू

**बोरगाव मंजू :** पोलिस स्टेशन हद्दीतील काटेपुर्णा नजीक लोहमार्गावर धावत्या रेल्वेतून पडून एका २० वर्षिय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना बुधवार दिनांक २० मार्च रोजी सकाळच्या सुमारास उघडकीस आली, बोरगाव मंजू पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून अनोळखी युवकाची ओळख पटविण्याचे आवाहन केले आहे, सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार काटेपुर्णा रेल्वे स्टेशन होम सिंगल लोहमार्गावर एका तरुणाचा मृतदेह रेल्वे कर्मचाऱ्यांना आढळून आला, सदर घटनेची माहिती बोरगाव मंजू पोलिसांना दिली.

वरुन घटनास्थळी पोलिस उपनिरीक्षक मनोज उघडे कर्मचारी सुदिप राऊत यांच्या सह पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

# शेतकऱ्यांची नुकसान भरपाईसाठी मागणी, मदत न मिळाल्यास रास्ता रोकोचा इशारा



**▪मुर्तिजापुर,दि २२ (प्रतिनिधी):** कुरुम मंडळातील शेतकऱ्यांनी अतिवृष्टी आणि सततच्या पावसामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीसाठी तत्काळ भरपाई मिळावी,अशी मागणी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे केली आहे. भारतीय किसान संघाचे विदर्भ प्रांत उपाध्यक्ष राहुल पुरुषोत्तम राठी यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी निवेदन सादर केले.सन २०२४-२५ च्या खरीप हंगामात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यांत झालेल्या सततच्या पावसामुळे सोयाबीन, तूर, कपाशी, मूग, उडीद यासह फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यामुळे उत्पादनात मोठी घट होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले.शेतकऱ्यांनी शासनाकडे ८ दिवसांत नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे. जर मदत वेळेत मिळाली नाही, तर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक छ-५३ वर रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनाची संपूर्ण जबाबदारी शासनावर असेल, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.शेतकऱ्यांच्या मागण्यांची तात्काळ दखल घेतली जाणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पत्रकारावरील भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ हिवरखेड ठाणेदारांना निवेदन



**▪हिवरखेड,दि २२ (प्रतिनिधी):** अकोला येथील ज्येष्ठ पत्रकार विठ्ठल महाले यांच्यावर दोन दिवसांपूर्वी भ्याड हल्ला करण्यात आला त्या निषेधार्थ हिवरखेड येथील आदर्श पत्रकार संघाच्यावतीने हिवरखेड पोलीस स्टेशनला निवेदन देण्यात आले विठ्ठलराव महाले यांच्यावर हल्ला करणाऱ्यांवर पत्रकार संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल करून आरोपीवर शासन व्हावे अशी मागणी करण्यात आली पत्रकार हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असल्याने पत्रकारांवरील हल्ले वाढणे ही गंभीर बाब आहे व हा लोकशाही वरच हल्ला असल्याचे पत्रकारांनी म्हटले आहे

या घटनेतील आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी पत्रकारांनी केली आहे अन्यथा आंदोलनाचा इशारा सुद्धा देण्यात आला आहे.सदर निवेदन पोलीस उपनिरिक्षक श्रीराम जाधव, प्रफुल पवार, दीपक ढोले आकाश गजभर ,धीरज साबळे यांच्या मार्फत देण्यात आले.

# नवोदय फाउंडेशनचा जागतिक जल दिन साजरा

**▪अकोला,दि २२ (प्रतिनिधी):** ग्रामीण विकासासाठी सेवारत असणाऱ्या जिल्ह्यातील नवोदय ग्रामीण विकास संस्था,सांगवी मोहाडी यांच्या वतीने सांगवी मोहाडी येथे जागतिक जल दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात पाणी संवर्धन, जलसंधारण व जल व्यवस्थापनावर सखोल चर्चा झाली.जल संकटाच्या पार्श्वभूमीवर पाण्याच्या शाश्वत वापराबाबत जनजागृती निर्माण करणे आणि जलसंवर्धनाचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा युवा अधिकारी महेशसिंह शेखावत होते तर उद्धाटक म्हणून माजी कृषी अधिकारी मोहने होते. प्रमुख पाहुणे म्हणून एफपीसी चे चेअरमन जगदीश मुरुमकर, सुमित्राताई अंधारे कृषी महाविद्यालयाचे अध्यक्ष कृष्णाभाऊ अंधारे,ग्रामीण विकास,सामाजिक लेखा परीक्षक व सल्लागार,



मंत्रालय मुंबईचे प्रविण इंगळे,वन अधिकारी थोरात, डॉ. के. डी. घरडे,कृषी विद्यापीठाच्या एसडब्लूसीई विभागाचे डॉ. यत्नेथ बिसेन, भारतीय वृक्ष क्रांतीचे संस्थापक नाथन आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमात सांगवी मोहाडी, उगवा आणि सुकोडा येथील नागरिक, युवक व कास्तकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी जलसंधारणावर विशेष भर देत मान्यवरांनी ग्राम स्थांना पाणीटंचाई टाळण्या साठी प्रभावी उपाययोजना राबवण्याचे मान्यवरांनी आवाहन केले.अंतिम सत्रात जल व्यवस्थापन, पाणीटंचाई निवारण व स्थानिक पातळीवर जलस्रोत जतन करण्याच्या उपाययोजनांवर सखोल चर्चा करण्यात आली.या कार्यक्रमाच्या माध्यमातून पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. मान्यवरांनी जलसंधारण आणि शाश्वत जलव्यवस्थापनासाठी स्थानिक नागरिकांनी पुढाकार घ्यावा.

# शहरातील भाजी बाजारात कचरा आणि दुर्गंधी

**▪अकोला,दि २२ (प्रतिनिधी):** अकोला शहरातील भाजी बाजारात कचरा आणि दुर्गंधी ही एक गंभीर समस्या बनली आहे. या समस्येमुळे नागरिकांच्या आरोग्यावर आणि बाजारपेठेच्या स्वच्छतेवर विपरित परिणाम होत आहे. त्याचा स्थानिक व्यापारावर देखील परिणाम होत आहे.



वाढत्या उन्हात भाजी पाला लवकरच वाळतो, सडतो. भाजी बाजारात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी पुरेशी व्यवस्था नाही. काही व्यापारी भाजीपाला आणि इतर कचरा भाजी बाजारात सोडून देतात किंवा तिथेच टाकतात, ज्यामुळे दुर्गंधी पसरते.

ज्यामुळे कचरा सडतो आणि दुर्गंधी वाढते. बस स्थानक ते रेल्वे स्थानक रोडवर या दूर्गंधीमुळे लोकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. भाजी बाजारात नियमित स्वच्छता होत नाही. कचरा आणि दुर्गंधीमुळे डास, माश्या आणि इतर कीटकांचा प्रादुर्भाव वाढतो, ज्यामुळे आजार पसरण्याचा धोका वाढतो. दुर्गंधीमुळे ग्राहक भाजीपाला खरेदी करणे टाळतात, ज्यामुळे व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. भाजी बाजारात कचरा व्यवस्थापनाची योग्य सोय करणे आवश्यक आहे. ओला आणि सुका कचरा वेगवेगळा जमा करण्यासाठी योग्य व्यवस्था करावी लागेल.

# जुन्या वादातून तिघांची युवकाला दुकानावर मारहाण

**▪पातुर,दि २२ (प्रतिनिधी):** पातुर पोलीस स्टेशन अंतर्गत खानापूर रोडवरील समता नगर येथे १९ मार्च २०२५ रोजी रात्री साडेसात वाजताच्या दरम्यान जुन्या वादातून आरोपी नी फिर्यादी अश्विन मुकुंदा गुडधे वय २७ राहणार समता नगर याचा भाऊ सतीश याला एका दुकानावर आरोपींनी शिवीगाळ करून मारहाण केल्यावरून आरोपी विरुद्ध विविध कलमान्वये पातूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पातुर पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी अश्विन मुकुंदा गुडदे राहणार समता नगर पातुर यांच्या तक्रारीवरून त्याचा भाऊ सतीश हा खानापूर रोडवरील मंगेश नागे यांच्या दुकानावर काही सामान आण्ण्यासाठी गेला असता आरोपी बंडू हिवराळे यांच्यासोबत जुना वाद असून सोहम हिवराळे हा पुण्याला असतो मात्र आठ दिवसापासून तो पातुर येथे आला असून सोहम यांच्यसह शुभम हिवराळे आर्दीनी सतीश याला संध्याकाळी दुकानावर शिवीगाळ करीत व मारण्याची धमकी देत मारहाण केली त्या कारणावरून तिघांविरुद्ध पातूर पोलिसात बी एन एस प्रमाणे ११८(१), ३५१( २) ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पातुर पोलीस करीत आहे.



**गाळ मुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार ही योजना अकोला जिल्ह्यात राबविण्याच्या संदर्भात आज जिल्हाधिकारी अजित कुंभार यांची भेट घेतली। या संदर्भात महाराष्ट्र सरकार आणि भारतीय जैन संघटने दरम्यान झालेल्या सामंजस्य कराराची प्रत जिल्हाधिकार्यांना देण्यात आली यावेळी भारतीय जैन संघटनेचे प्रा. सुभाष गादिया, अरूण मानोरकर, विमल जैन, निलेश गोठी, रवी जैन, जिल्हा कार्यक्रम समन्वयक विष्णू गव्हाळे , जिल्हा जलसंधारण अधिकारी अमोल मस्कर आणि चंद्रशेखर खंडेराव उपस्थित होते.**

# नगरपरिषद कर्मचाऱ्यांवर आली उपासमारीची वेळ

**तेल्हारा:** नगरपरिषद कर्मचाऱ्यांचे पगार व भत्ते गेल्या ६ महिन्यापासून नगरपरिषद मुख्याधिकारी सतीश गावंडे देत नसल्यामुळे या कर्मचाऱ्यांवर उपासमारीची पाळी आली.कर्मचाऱ्यांनी व्यथा मांडली. संपूर्ण महाराष्ट्रात नगरपालिका व महानगरपालिकेच्या निवडणुका होत नसल्याकारणाने गेल्या काही वर्षापासून प्रशासक म्हणून मुख्याधिकारी यांच्या हातात पदभार दिल्यामुळे त्यांचा एक कलमी कार्यक्रम सुरू असून कर्मचाऱ्यांनी आपली व्यथा मांडावी तरी कुणाकडे ? असा प्रश्न जयवंत विठ्ठल बोळे, यांच्यासह अनेक कर्मचाऱ्यांपुढे उभा झाला आहे.

# सेठ बन्सीधर विद्यालयाच्या शताब्दी महोत्सवात मान्यवरांचा व ८० वर्षावरील माजी विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न

**▪तेल्हारा,दि २२ (प्रतिनिधी):** स्थानिक सेठ बन्सीधर विद्यालय शताब्दी महोत्सव अंतर्गत शुक्रवार दि.२१ मार्च रोजी सकाळी अकरा वाजता ८० वर्षावरील माजी विद्यार्थी, तेल्हारा तालुक्यातील आजी माजी सैनिक, शहरातील पत्रकार, निमंत्रित मान्यवरांचा शिक्षण संस्थेतर्फे यथोचित सत्कार करण्यात आला.सत्कार समारंभा पूर्वी शाळेच्या प्रांगणातील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचे मान्यवरांच्या हस्ते पूजन व हारार्पण तसेच प्राथमिक शाळेच्या वर्ग खोल्या समोरील खुल्या सभागृहात भरविण्यात आलेल्या २००० देशभक्त क्रांतिकारकांच्या छायाचित्रांचे प्रदर्शनाचे फीत कापून उद्धाटन करण्यात आले .सदर प्रदर्शन कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणे यांनी सादर केले होते ' ओळख देशभक्तांची, शाळा तेथे क्रांती मंदिर 'अभियाना अंतर्गत ट्रस्ट चे विश्वस्त देशभक्त कोषकार चंद्रकांत शांताराम शहासने यांनी हे प्रदर्शन प्रदर्शित केले होत. यावेळी ऐतिहासिक पुरातन शस्त्रास्त्र व वस्तू तसेच प्राचीन नाणी यांचे प्रदर्शनाचे उद्धाटनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सदर प्रदर्शनाचे संकलनकर्ते देशमुख गुरुजी भांबेरी हे होते .सेठ बन्सीधर विद्यालयातील घोष पथकातील विद्यार्थ्यांनी आलेल्या मान्यवरांचे



घोषाचे तालावर स्वागत केले व विद्यार्थिनींनी औक्षण केले. स्वामी विवेकानंद ज्ञानपीठाच्या समोरील खुल्या सभागृहात मुख्य समारंभाच्या अध्यक्षस्थानी सेठ बन्सीधर दहिगावकर हायस्कूल एज्युकेशन सोसायटी तेल्हाराचे विद्यमान अध्यक्ष गोपालदास मल्ल होते. तर व्यासपीठावर संस्थेचे उपाध्यक्ष विलासराव जोशी, माजी अध्यक्ष राजेंद्र कुमार शाह, कॅप्टन स्नेहल पोटे, अकोला येथील निवृत्त मुख्याध्यापिका तथा विद्याभारतीच्या कार्यकर्त्या ताराताई हातवळणे, विद्याभारतीचे अकोला महानगर अध्यक्ष मंगेश वानखडे, प्रांताध्यक्ष सचिन जोशी, आजी माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष सुभेदार जवकार इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती. प्रारंभी देवी सरस्वती, सेठ बन्सीधर झुनझुनवाला, स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पूजन, दीप प्रज्वलन व हार अर्पण करण्यात आले. याप्रसंगी ८० वर्षावरील ५० माजी विद्यार्थी, ४५ आजी-माजी सैनिक,३५ विशेष आमंत्रित व २५ पत्रकार अशा मान्यवरांचा संस्थेच्या वतीने शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह प्रदान करून यथोचित सत्कार करण्यात आला आहे.

# थकित करापोटी उत्तर झोन येथील चार मालमत्तांवर सीलची कारवाई

**▪अकोला,दि २२ (प्रतिनिधी):** मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा उपायुक्त गीता ठाकरे आणि कर अधिक्षक विजय पारतवार यांच्या मार्गदर्शनात अकोला महानगरपालिका क्षेत्रातील उत्तर झोन, पी.एच.मार्केट, टिळक रोड येथील वार्ड क्रं. सी-३ मालमत्ता क्रं. ४४५ धा.महेश मोटवानी यांचेकडे २०१७-१८ पासून आज पर्यतचे एकुण रक्कम रूपये ५,१७,६०४/- एवढा मालमत्ता कर थकित असल्याने तसेच जुना कॉटन मार्केट येथील वार्ड क्रं. सी-३ मालमत्ता क्रं. १०१९, धा.राजस्थान प्रिंटींग प्रेस यांचेकडे २०१७-१८ पासून आज पर्यतचे एकुण रक्कम रूपये १२,५०,६३६/- एवढा मालमत्ता कर थकित असल्याने तसेच



दगडी पुल रोड येथील वार्ड क्रं. सी-३ मालमत्ता क्रं. २५०, धा.राजेंद्र तापडीया यांचेकडे २०१७-१८ पासून आज पर्यतचे एकुण रक्कम रूपये ३,०१,५०१/- एवढा मालमत्ता कर थकित असल्याने तसेच



दगडी पुल रोड येथील वार्ड क्रं. सी-३ मालमत्ता क्रं. २५१, धा.राजेंद्र तापडीया यांचेकडे २०१७-१८ पासून आज पर्यतचे एकुण रक्कम रूपये ५,३३,७७८/- एवढा मालमत्ता कर थकित असल्याने या चारही मालमत्तांवर सील लावण्याची कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कारवाई सहा.आयुक्त विठ्ठल देवकते यांच्या मार्गदर्शनात झाली असून या कारवाईत सहा.कर अधिक्षक हेमंत शेळवणे, मोहन घाटोळ, संतोष सुर्यवंशी, कनिष्ठ अभियंता स्वप्नील लहामगे, दर्शन मते, हरिष चव्हाण, सुरक्षा रक्षक बाली इंगळे आदींची उपस्थिती होती.

अकोला महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता धारकांनी ३१ मार्च २०२५ पर्यत मनपा व्दारा सुरू असलेल्या शास्ती अभय योजनेचा लाभ घेऊन आपला थकित व चालू वर्षातील मालमत्ता कराचा भरणा एकरकमी करून सील व जप्ती सारख्या अप्रीय कारवाई टाळावे असे आवाहन मनपा प्रशासनाव्दारे करण्यात आले आहे.

# आर्थिक विकास महामंडळाला नाथपंथी चे आराध्य दैवत गुरु गोरक्षनाथ महाराजांचे नाव देण्याची मागणी

**▪मुर्तिजापुर,दि २२ (प्रतिनिधी):** युवा नाथ संघटना महाराष्ट्र व हिरपूर नाथ समाज यांच्यातर्फे उपविभागीय अधिकारी मुर्तीजापुर यांना निवेदन देण्यात आले.राज्यातील नाथपंथीय समाजाची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी कार्यरत असलेल्या वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळा अंतर्गत आर्थिक विकास स्थापन करून दिल्याबद्दल शासनाने मान्यता दिली त्याबद्दल शासनाचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात येत आहे. सदरचे महामंडळ परमपूज्य गंगनाथ महाराज आर्थिक विकास महामंडळ या नावाने आपण दिले आहे. परंतु नाथपंथीय समाजाचे गुरु व आराध्य दैवत गोरक्षनाथ हे आहेत नाथपंथी समाजाच्या वतीने आपणास विनंती करण्यात येते की या महामंडळाला गुरु गोरक्षनाथ यांचे नाव देऊन शासन निर्णय क्रमांक महाम/२०२४/८०. प्रक्र/ महामंडळे या शासन



निर्णयाचे शुद्धिपत्रक काढून त्या महामंडळाला गुरु गोरक्षनाथ आर्थिक विकास महामंडळ हे नाव द्यावे असे युवा नाथ संघटना महाराष्ट्र अध्यक्ष श्री राहुल इंगळे, डॉ. सो सौ. संगीता सुरंसे, सुबोध वंजारे, पत्रकार दिलीप तिहिले,स्वप्निल पाठक, नागेश जाधव यांच्यातर्फे अशा प्रकारचे निवेदन उपविभागीय अधिकारी मुर्तिजापुर यांना देण्यात आले आहे.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम खोले फोन ९८८१४८१४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# गुप्तचर यंत्रणाची माहिती कमी पडली

## मुख्यमंत्री फडणवीस यांची कबुली

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २२ :



शहरातील भडकलेल्या दंगलीबाबत गुप्तचर यंत्रणांचे अपयश असे म्हणता येणार नाही, पण अधिक चांगले इनपुट्स गुप्तचर यंत्रणा देऊ शकली असती. त्यामुळे गुप्तचर यंत्रणा पूर्णपणे माहिती ठेवण्यात कमी पडली, अशी कबुली राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ते पोलीस आयुक्तालयातील सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी महाल-गांधीगेटसमोर औरंगेजबची प्रतिकात्मक कबर जाळली. कबरीवरील हिरव्या रंगाच्या चादरीवर आयत लिहिलेल्या होत्या, अशी संभ्रम निर्माण करणारी माहिती सोशल मीडियाच्या माध्यमातून मुद्दामून पसरविण्यात आले. त्यामुळे सोमवारी दंगल घडली. ही दंगल घडण्यामागे गुप्तचर यंत्रणेचे अपयश आहे का? असा प्रश्न विचारताच मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, दिवसभर सुरु असलेल्या या दंगलीबाबत पोलिसांच्या गुप्तचर यंत्रणेला बरीच माहिती होती. त्यामुळे गुप्तचर यंत्रणेचे अपयश म्हणता येणार नाही. मात्र, गुप्तचर यंत्रणा अधिक चांगली माहिती गोळा करु शकली नाही. गुप्तचर यंत्रणा पूर्णपणे अलर्ट मोडवर असती तर कदाचित वेगळे चित्र असते, अशी कबुली फडणवीस यांनी दिली.

फडणवीस पुढे म्हणाले, की पोलिसांनी काढलेल्या व्हिडिओमध्ये आणि प्रसारमाध्यमांवरील व्हिडिओमध्ये अनेक चेहरे समोर आले आहे. प्रत्येक दंगेखोराला शोधण्याचे काम पोलीस करीत आहेत. पोलिसांनी आतापर्यंत १०४ जणांची ओळख पटवली असून ९२ जणांना अटक केली आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून काही दंगलखोरांनी खोटी माहिती पसरवून दंगल भडकविण्याचा प्रयत्न केला आहे. ६८ जणांची ओळख पटवली असून त्यांच्यावर गुन्हे दाख करण्यात आले आहे.

संचारबंदीमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. त्यामुळे व्यापारी वर्गाचे मोठे नुकसान झाले आहे. मात्र, आता टप्प्याटप्प्याने संचारबंदी शिथील करण्यात येणार आहे. मुख्यमंत्र्यांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांशी आयुक्तालयात बैठक घेतली आहे. शेवटच्या दंगेखोरावर गुन्हे दाखल करुन कारवाई करा. प्रत्येकाला चागंला धडा शिकवा. यांना आता सरळ केले नाही तर भविष्यात त्यांची हिम्मत वाढेल. दंगेखोरांनी पोलिसांवर हल्ला केला आहे. त्यात ३ पोलीस उपायुक्तांसह ३५ कर्मचारी जखमी झाले आहेत.

# नागपुरात दंगलीचा मास्टरमाइंड फहीम खानला कोठडी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २२ :

नागपुरात औरंगजेबाच्या कबरीच्या प्रतिकृतीशी संबंधित घटनेनंतर उसळलेल्या दंगलप्रकरणी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. मायनॉरिटी डेमोक्रॅटिक पार्टीचा शहराध्यक्ष फहीम खान शमीम खान याला न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

पार्टीचे कार्यकारी अध्यक्ष हमीद इंजिनियर आणि त्यांचा साथीदार मोहंमद शहजाद खान यांनाही अटक करण्यात आली आहे. हमीद इंजिनियर यांनी सोशल मीडियावर हिंसाचाराचे समर्थन करणारे आणि

### एमडीपी अध्यक्ष हमीद इंजिनियर व साथीदारालाही अटक

### १०० हून अधिक दंगेखोर ताब्यात

दंगल भडकवणारे व्हिडिओ व्हायरल केले होते. त्यांच्या यूट्यूब चॅनेलवरून चिथावणीखोर पोस्ट करण्यात आल्या होत्या. तपासात आणखी एक धक्कादायक बाब समोर आली आहे. हमीद इंजिनियर यांनी मुजाहिदीन आणि गाझापट्टीसाठी देणग्या गोळा करण्याचे आवाहन केले होते. दंगलीच्या मास्टरमाइंड फहीम खान यांनी तुरुंगात छातीत दुखत असल्याची तक्रार केली होती. त्यांची ऑनलाइन सुनावणी घेण्यात आली.



पोलिस आयुक्त रवींद्र सिंगल यांच्या माहितीनुसार, या प्रकरणी विविध पोलिस ठाण्यांमध्ये १३ एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. आरोपींविरुद्ध भारतीय न्यायसंहिता कलम २५२, १९२, १९६, ३५३ १ (ब), ३५३ १ (क) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले.

# हल्दीराम सिंगापूरच्या कंपनीला ९ टक्के हिस्सा विकणार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :




नागपूरच्या प्रसिद्ध हल्दीराम कंपनीने वर्षभराच्या वाटाघाटीनंतर अखेर जागतिक गुंतवणूकदारांसोबत सौदा अंतिम केला आहे. सिंगापूरच्या सरकारच्या मालकीच्या टेमासेक होल्डिंग्स कंपनीला ९ टक्के हिस्सा विकण्यात येणार आहे. या व्यवहारामुळे कंपनीचे मूल्यांकन तब्बल ८४,००० कोटींवर गेले आहे. यासोबतच हल्दीराम कुटुंबातील दोन मोठे व्यवसाय–नागपूरचे हल्दीराम फूड्स आणि दिल्लीचे हल्दीराम स्नॅक्स–एकत्र येणार आहेत.

या दोन्ही कंपन्यांचे विलीनीकरण लवकरच अधिकृत करण्यात येणार असून, नव्या कंपनीचे नाव हल्दीराम फूड्स अँड स्नॅक्स असेल. हल्दीराम सध्या मिठाई, नमकीन, रिटेल स्टोअर्स आणि रेस्टॉरंट्समध्ये मोठ्या प्रमाणात कार्यरत आहे. कंपनीची निर्यात मोठ्या प्रमाणावर होत असून, भारताबाहेरही भारतीय लोकसंख्येच्या गरजा भागवत आहे. ब्रँडच्या प्रतिष्ठा, बाजारातील विस्तार आणि भविष्यातील संधींच्या आधारे ही मोठी किंमत ठरवण्यात आली आहे.

यापूर्वी अमेरिकेच्या ब्लॅकस्टोन कंपनीसोबत वाटाघाटी सुरू होत्या, पण त्या यशस्वी झाल्या नाहीत. सुरुवातीला कुटुंबाने आपला बहुतेक हिस्सा विकण्याचा विचार केला होता, पण नंतर तो बहुसंख्य हिस्सा स्वतःजवळ ठेवण्याचा निर्णय झाला. नव्या व्यवस्थेनुसार, टेमासेक कंपनीला बोर्ड ऑफ डायरेक्टर्समध्ये स्थान मिळेल. तसेच, कंपनीचे प्राथमिक समभाग विक्री (आयपीओ) लवकरच बाजारात येणार आहे.

पुढील दोन वर्षांत हा आयपीओ पूर्ण होईल, अशी अपेक्षा आहे. कंपनी या नव्या गुंतवणुकीतून भारतासह जागतिक स्तरावरही आपला विस्तार करणार आहे. हलदीरामचा प्रवास १९६७ मध्ये नागपुरात सुरू झाला होता. संस्थापक शिवकिशन अग्रवाल यांनी इतवारी येथे छोट्या दुकानातून व्यवसाय सुरू केला होता.

# टेम्पोने रिक्षाला दिलेल्या धडकेत तरूणाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २२ :

बोरीवली पश्चिम येथे टेम्पोने रिक्षाला दिलेल्या धडकेत २५ वर्षीय तरूणाचा मृत्यू झाला. घटनेनंतर टेम्पो चालकाने घटनास्थळावरून पलायन केले असून याप्रकरणी बोरीवलीतील एम.एच.बी. कॉलनी पोलिसांनी अज्ञात टेम्पो चालकाविरोधात निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे.

सुनील विश्वकर्मा असे मृत तरूणाचे नाव असून तो नालासोपारा पूर्व येथील रहिवासी आहे. सुनील व त्याचे वडील राजेंद्र विश्वकर्मा (५६) दोघेही सुतारकाम करतात. ते १३ मार्च रोजी सकाळी दोघेही बोरीवली पश्चिम मधील न्यू लिंकरोड येथील योगीनगर परिसरात आले होते. काम आटोपल्यानंतर रात्री नऊच्या सुमारास ते घरी जाण्यासाठी निघाले. त्यासाठी त्यांनी बोरीवली परिसरातून शेअरिंग रिक्षा पकडली. काही अंतरावर रिक्षाच्या उजव्या बाजूला टेम्पोने जोरदार धडक दिली.

# मुस्लीमांवरच देशद्रोहाचे गुन्हे का?

## काँग्रेस नेते ठाकरेंचा सरकारला सवाल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २२ :

नागपुरातील हिंसाचाराचा घटनाक्रम बघता सरकार दुजाभाव करीत असल्याचे दिसून येते. नागपुरात कधीही अशी हिंसक घटना घडली नाही. नागपुरातील लोक शांतप्रिय आहेत. राज्यात विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल निदर्शन करत आहेत. आणि अशांतता निर्माण करत आहेत. त्यात भाजपचे नेते वादग्रस्त, प्रक्षोभक वक्तव्य करत आहेत.

सरकारमधील लोकही बेछुट विधान करत आहेत. राज्य सर्वांना समानता राखून न्याय देण्याची ज्यांची जबाबदारी आहे. तेच लोक कायदा आणि सुव्यवस्था उदध्वस्त करत असल्याचे चित्र आहे, असे काँग्रेसच्या सत्यशोधन समितीचे अध्यक्ष माणिकराव ठाकरे म्हणाले. काँग्रेसची सत्यशोधन समिती आज नागपुरात होती. त्यावेळी ते बोलत होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नागपूर झालेल्या हिंसाचारासाठी एका विशिष्ट समाजाला दोष देणारे वक्तव्य करतात. भाजपचे नेते, सरकारमधील मंत्री कायदा-सुवस्था बिघडवून शकतील, असे वक्तव्य करतात. त्यांनी जणून चिथावणीचा कार्यक्रम हाती घेतल्याचे दिसून येते, असा आरोप काँग्रेसच्या सत्यशोधन समितीचे माणिकराव ठाकरे यांनी केला.


राज्य सरकारची प्रमुख जबाबदारी कायदा आणि सुवस्था राखण्याची आहे. सर्व जाती, धर्माच्या लोकांना सुरक्षित ठेवण्याची राज्य सरकारची जबाबदारी आहे. मुख्यमंत्री दंगल घडवण्याचे पूर्वनियोजित षडयंत्र असल्याचे म्हणतात. हे जर षडयंत्र असेलतर त्यांचे पोलीस खाते काय करत होते. हे सरकार राज्य कारभार चालवण्यात अपयशी ठरले आहे. त्यामुळे राज्यपालांनी सरकार बरखास्त करावी, असेही ठाकरे म्हणाले.

नागपूरच्या दंगलीस जबाबदार कोण आहे. या दंगलीनंतर मुस्लीमांवर देशद्रोहाचे गुन्हे दाखल केले आहेत. विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी मुस्लीमांसाठी पवित्र आयत असलेली चादरीची विंटबना केली आणि जाळली. मुस्लीमांना चिथावणी देण्याचे काम व्हीएचपी आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी केली. त्यांच्यावर किरकोळ गुन्हे दाखल करून त्यांना सोडून देण्यात आले.

पोलीस आणि त्या कार्यकर्त्यांचे प्रेमाचे नाते आहे. त्यामुळे त्यांनी ते स्वतःहून पोलीस ठाण्यात आल्यावर किरकोळ गुन्हे दाखल केले आणि सोडून दिले. मात्र मुस्लीमांवर देशद्रोहाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. चादर जाळणाऱ्याविरुद्ध देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी ठाकरे यांनी केली. औरंगजेबाची कबर काढून टाकण्याची मागणी आणि त्यासंदर्भात प्रक्षोभक वक्तव्य भाजप, व्हीएचपी आणि बजरंग दलाच्या लोकांकडून केले जात होते. परंतु त्यावर कोणतीही प्रतिक्रिया मुस्लीम समाजाने दिली नाही. अशा स्थितीत नागपूर पोलिसांनी मोर्चा काढण्याची परवानगी कशी दिली. पोलिसांनी इतर समाजाच्या भावना भडकवण्याचा प्रयत्न हाणून का पाडला नाही, असा सवालही त्यांनीकेला.

# प्रशांत कोरटकरविरोधात लुकआउट नोटीस जारी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २२ :



इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना धमकी आणि छत्रपती शिवाजी महाराजांविषयी आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या प्रशांत कोरटरकविराधोत कोल्हापूर पोलिसांनी लूकआऊट नोटीस काढली आहे. यामुळे प्रशांत कोरटकरच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. कोल्हापूर पोलिसांनी प्रशांत कोरटकरचा पासपोर्टही जप्त केला आहे. त्यामुळे प्रशांत कोरटकर बाहेर देशात पळून जाण्याची शक्यता कमी आहे.

१८ मार्च २०२४ रोजी सत्र न्यायालयाने प्रशांत कोरटकरचा जामीन अर्ज फेटाळला. तेव्हापासून तो फरार आहे. त्याच्या शोधकामी पोलिसांची पथके नागपूर, चंद्रपूर आणि मुंबई या तीन ठिकाणी तपास करत आहेत. मात्र, पोलिसांच्या हाती काही लागले नाही. अखेर कोल्हापूर पोलिसांकडून आज प्रशांत कोरटकर विरोधात लूकआऊट नोटीस जारी करण्यात आली आहे. तसेच कोरटकरने कुठे-कुठे विमान प्रवास केला, याबाबत ब्युरो ऑफ इम्रिगेशन यांच्याकडून माहिती घेतली जाणार आहे.

लूकआऊट नोटीस हे भारतातील अधिकाऱ्यांद्वारे वापरले जाणारे एक परिपत्रक आहे जे प्रवासी व्यक्ती पोलिसांना हवा आहे की नाही हे तपासण्यासाठी वापरले जाते. सोप्या भाषेत सांगायचे तर, आंतरराष्ट्रीय विमानतळ किंवा समुद्री बंदरांसारख्या आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून प्रवास करणाऱ्या व्यक्तींची तपासणी करण्यासाठी याचा वापर केला जातो.

जेव्हा एखादा गुन्हेगार अटक टाळण्यासाठी फरार होतो, तेव्हा लूकआऊट नोटीस जारी केली जाते. लूकआऊट नोटीसला लूकआऊट सर्क्युलर असेही म्हणतात. कधीकधी, कायदा अंमलबजावणी संस्था ज्यांच्यासाठी विनंती करतात त्यांच्याविरुद्ध लूकआऊट नोटिस जारी केल्या जातात. भारतात लूकआऊट नोटीस गृह मंत्रालयाने जारी केलेल्या काही मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून जारी केली जाते.

कोणत्याही आरोपीविरुद्ध (भारतीय किंवा परदेशी) लूकआऊट नोटीस म्हणजेच एलओसी जारी केली जाऊ शकते. जर एखादा गुन्हेगार जाणूनबुजून अटक टाळत असेल किंवा न्यायालयात हजर राहण्यास नकार देत असेल, तर त्याच्याविरुद्धही लूकआऊट नोटीस बजावली जाऊ शकते. न्यायालये, सीबीआय, ईडी, एसएफआयओ आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँकांसह १५ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार ही नोटीस जारी केली जाऊ शकते.

# जनता जातीयवादी नाही पुढारी जातीयवादी : नितीन गडकरी



■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. २२ :

समाजकारण म्हणजेच राजकारण आहे. हे करणाऱ्याला पोस्टर लावण्याची गरज भासत नाही. मीही लोकसभेत निवडून आलो, पण लोकांना सांगितले की, माज्या हिशेबाने राजकारण चालेल, तुम्हाला मत द्यायचे असेल, तर द्या, नाही दिले तरी चालेल. जो मत देईल त्याचेही काम करेल, नाही देणार त्याचेही करेल. मी तत्वांशी तडजोड करणार नाही. जात पुढारी निर्माण करतात. जनता जातीयवादी नाही, पुढारी जातीयवादी आहेत, ते आपल्या स्वाथार्साठी जात समोर करतात, असे परखड मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी शनिवारी येथे व्यक्त केले. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित समारंभात नितीन गडकरी यांना डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार हे आभासी पद्धतीने उपस्थित होते.

यावेळी खासदार बळवंत वानखडे, आमदार सुलभा खोडके, प्रवीण पोटे, नवनियुक्त आमदार संजय खोडके, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख आदी उपस्थित होते. नितीन गडकरी म्हणाले, मागासलेपण हा राजकारण्यांचा आवडीचा विषय आहे. आजकाल कोण मागास आहे, याची स्पर्धाच सुरू झाली आहे.

# विधवा महिलेची गळा आवळून हत्या

■ महासागर प्रतिनिधी,
भंडारा, दि. २२ :



अनैतिक संबंधातून गावातीलच तरुणाने विधवा महिलेचा नॉयलॉन दोरीने गळा आवळून निर्घृणपणे खून केल्याची घटना लाखनी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील ग्राम मोगरा/शिवणी येथे (दि.२१) मार्च रोजी दुपारी ३ वाजता दरम्यान घडली. पुष्पा रामेश्वर बनकर (वय ३७ वर्षे,रा. मोगरा/शिवणी, ता. लाखनी) असे मृतक महिलेचे नाव असून, खुशाल पुरुषोत्तम पडोळे (वय २७ वर्षे, रा.मोगरा, त. लाखनी) असे आरोपी तरुणाचे नाव आहे. या घटनेतील मृतक व आरोपी एकाच गावातील रहिवासी आहेत. मृतक पुष्पा बनकर ही भाजीपाल्याचा व्यवसाय करून आपल्या २ मुलांचा सांभाळ करत होती. गत काही वर्षापुवी तिच्या पतीने गळफास घेऊन आत्महत्या केली होती. दरम्यान, शुक्रवारी दुपारच्या सुमारास आरोपी खुशाल पडोळे याने तिला शेत शिवारातील नाल्याकडे बोलावले आणि नंतर आरोपीने दोरीने गळा आवळून तिचा निर्घृणपने खून केला.

मृतक पुष्पा व आरोपीचे मागील अडीच वषार्पासुन अनैतिक संबंध असल्याची माहिती समोर येत आहे. मोगरा येथील नाल्याजवळ मृतक महिलेचे शेत आहे. शेतात उन्हाळी धान पिकाची लागवड केली आहे. घटनेच्या दिवशी मृतक महिला ही शेतात धान पिकाची पाहणी करण्यासाठी गेली होती. थोड्या वेळाने आरोपी तिथे गेला. यादरम्यान दोघात वाद झाला. या वादातून आरोपीने मृतकाच्या शेतालगत असलेल्या सागवानाच्या वाडीत दोरीने गळा आवळून विधवेचा निर्घृणपणे खून केला. यानंतर आरोपीने लाखनी पोलिस ठाणे गाठले व हत्येची कबुली दिली. लगेच पोलिस घटनस्थळी दाखल झाले. मृतदेह तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालय लाखनी येथे पाठवला.

# नागपूर हिंसाचार प्रकरणातील मुख्य आरोपी फहीम खानने मागितला जामीन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :

१७ मार्च रोजी नागपूरमध्ये झालेल्या हिंसाचारातील मुख्य आरोपी फहीम खानने सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला आहे. फहीमने असा दावा केला आहे की, विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांवर कारवाईची मागणी केल्यामुळे त्याला राजकीय सूडबुद्धीतून अटक करण्यात आली.

औरंगजेबाची कबर हटवण्यावरून झालेल्या हिंसाचार प्रकरणी मास्टरमाइंड फहीमसह ६ आरोपींविरुद्ध देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फहीमवर ५०० हून अधिक दंगलखोरांना जमवण्याचा आणि हिंसाचार भडकवण्याचा आरोप आहे.

दंगल आणि जाळपोळीच्या घटनांनंतर दोन दिवसांनी १९ मार्च रोजी अल्पसंख्याक डेमोक्रॅटिक पक्षाचे शहराध्यक्ष खान यांना अटक करण्यात आली. शुक्रवारी पोलिस कोठडी संपल्यानंतर फहीमला न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले. यानंतर फहीमने नागपूर जिल्हा सत्र न्यायालयात जामीन अर्जही दाखल केला. त्याचे वकील अश्विन इंगोले म्हणाले की, या प्रकरणाची सुनावणी २४ मार्च रोजी होऊ शकते.

या घटनेसंदर्भात आणखी तीन नवीन एफआयआर नोंदवण्यात आले आहेत.

### फहीमच्या याचिकेत ३ दावे

जामीन अर्जात म्हटले आहे की त्याला या प्रकरणात खोटे गोवण्यात आले आहे आणि त्याने जमावाला भडकावल्याचा कोणताही पुरावा नाही. हे आरोप खोटे आणि निराधार आहेत आणि पोलिसांनी हिंसाचारात त्याची थेट भूमिका असल्याचे सांगितलेले नाही. त्याच्याविरुद्ध दाखल केलेला खटला राजकीय सूड बुद्धीने चालवला जात आहे कारण १८ मार्च रोजी त्यांनी विश्व हिंदू परिषदेच्या सदस्यांविरुद्ध एफआयआर दाखल करण्याची मागणी केली होती.

त्याचबरोबर, शहराच्या काही भागातून संचारबंदी उठवण्याचा निर्णय उच्चस्तरीय आढावा बैठकीनंतर घेतला जाईल.

नागतपुरात उसळलेल्या दंगल प्रकरणी शनिवारी मायनॉरिटी डेमोक्रॅटिक पार्टीचा कार्यकारी अध्यक्ष हमीद इंजिनियर याच्यासह त्याचा साथीदार मोहंमद शहजाद खान यालाही अटक करण्यात आली आहे. हिंसाचाराचे उदात्तीकरण करणाऱ्या कॉमेंटस करून दंगल आणखी भडकवण्यासाठी उचकवणाऱ्या कॉमेंट टाकून व्हिडीओ व्हायरल केल्यामुळे हमीद इंजिनियरसह साथीदारालाही अटक करण्यात आले आहे. यात फहीम आणि त्याचे साथीदार येतात.

# दोन वीजनिर्मिती संच बंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २२ :

राज्यात होळीनंतर एक- दोन दिवसांचा अपवाद सोडला तर रोज तापमानात वाढ नोंदवली जात आहे. त्यामुळे राज्यात विजेची मागणी वाढत असतानाच महानिर्मितीचे प्रत्येकी ५०० मेगावॅटचे दोन वीजनिर्मिती संच तांत्रिक बिघाडामुळे बंद पडले आहेत. हे दोन्ही संच चंद्रपूर औष्णिक विद्युत प्रकल्पातील आहेत. त्यामुळे अचानक विजेची मागणी वाढल्यास वीज पुरावठ्यावरही परिणामाचा धोका उद्भवण्याची शक्यता आहे.

महानिर्मितीच्या चंद्रपूर औष्णिक विद्युत प्रकल्पातील बंद संचांपैकी युनिट क्रमांक ५ हा बॉयलर ट्युब लिकेजमुळे बंद असून तो शनिवारी सुरू होण्याची शक्यता आहे. युनिट क्रमांक ९ हा तांत्रिक बिघाडामुळे बंद आहे. त्याच्याही दुरुस्तीचे काम सुरू आहे. शुक्रवारी (२१ मार्च) राज्याच विजेची मागणी २७,९०२ मेगावॅट होती. त्यापैकी १६,४१० मेगावॅट वीजनिर्मिती राज्यात होत होती तर ११,२४३ मेगावॅट वीज केंद्राच्या वाट्यातून मिळत होती.

राज्यातील एकूण वीज निर्मितीपैकी सर्वाधिक ७,१८१ मेगावॅट वीज महानिर्मितीकडून मिळत होती. त्यात महानिर्मितीच्या राज्यभरातील औष्णिक वीज प्रकल्पातील ५,४०३ मेगावॅट, उरन गॅस प्रकल्पातील २५२ मेगावॅट, जलविद्युत प्रकल्पातील १,४१५ मेगावॅट, सौर प्रकल्पातील १०३ मेगावॅट विजेचा समावेश होता. खासगी प्रकल्पांपैकी राज्याला जिंदलकडून ७९९ मेगावॅट, अदानीकडून १,४५८ मेगावॅट, आयडियलकडून १५३ मेगावॅट, एसडब्ल्यूपीजीएलकडून ३४७ मेगावॅट वीज मिळत होती. दरम्यान, राज्यातील विजेची मागणी मध्यंतरी ३० हजार मेगावॅटच्या जवळपास पोहचली होती. आता ही मागणी सुमारे एक हजार मेगावॅटने कमी झाली आहे. त्यामुळे दोन संच बंद पडल्यावरही विपरित परिणाम झालेला नाही. परंतु, अचानक विजेची मागणी वाढल्यास पुरवठ्यावर परिणाम होण्याचा धोका आहे. महावितरणच्या जनसंपर्क विभागाने मात्र मागणीनुसार आवश्यक तजवीज केल्याचा दावा केला आहे. एमएसईबी अर्थात महाराष्ट्र राज्य वीज मंडळ म्हणून पूर्वी ओळख असलेले महानिर्मिती किंवा महाजेनको हे महाराष्ट्रातील एक प्रमुख वीज निर्मिती कंपनी असून महाराष्ट्र राज्य वीज मंडळाचे पूर्ण स्वामित्व असलेली उपकंपनी आहे. १३,२२० मेगावॅट वीज उत्पादनासह हे राज्य सरकारच्या नियंत्रणाखालील भारतातील सर्वात मोठे वीज उत्पादक कंपनी आहे.

